अलिबाग-काशीद बीचजवळ
स्वतःच्या हक्काचे फार्म हाऊस !!!
सर्व सुविधांयुक्त फार्म प्लॉट
टायटल क्लिअर रिसॉर्ट सुविधा व
अन्य फायदे .६००/- PSF
अधिक माहितीसाठी-९१३७३५८८८०

कृषीवल
रायगड, शनिवार, दि. ९ नोव्हेंबर २०२४
किंमत ४ ₹

JOINT VENTURE
PROPOSAL for a N.A
Title Clear 175 Units Huge Complex Project at Nagaon- Alibaug.
Excellent investment with guaranteed project profitability for Builders/Developers.
Call-9137358880

# दळवींचं आश्वासन, पाण्यासाठी वणवण

**रोहामधील 26 गावांतील जलजीवन योजना ठप्प**



| अलिबाग | प्रतिनिधी |
रोह्यामधील २६ गावांतील नागरिकांना जलजीवन योजनेंतर्गत घरामध्ये २४ तास पाण्याचे आश्वासन आमदार महेंद्र दळवी यांनी दिले होते. कुंडलिका नदीतून पाणी आणून त्याचे शुद्धीकरण करून ते वर्षभरात घरापर्यंत पोहोचविले जाईल, असेदेखील सांगण्यात आले. परंतु, आश्वासनाची पूर्ती करण्यास दळवी अपयशी ठरल्याची चर्चा गावागावात सुरु आहे. शेकापचे नेते माजी आ. पंडित पाटील यांच्या काळात भातसई, धोंडखारपर्यंत अनेक गावांना एमआयडीमार्फत पाणी मिळत होते. परंतु, या पाच वर्षांत दळवींच्या काळात ही गावे एमआयडीच्या पाण्यापासून वंचित राहिली असल्याचे सांगण्यात आले आहे.

**कामांची फक्त बॅनरबाजी; सर्व कामे अद्याप अपूर्णावस्थेत**

### शुद्धीकरण केंद्रासाठी जागेचा अभाव

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, जलजीवन योजनेंतर्गत ३८ कोटींची ही योजना असून, २४ हजार २८५ लोकसंख्या असलेल्या या गावांतील नागरिकांना पाणीपुरवठा केला जाणार आहे. या योजनेचे ५० टक्के काम पूर्ण झाले आहे. शुध्दीकरण केंद्रासाठी जागेचा अभाव आहे. जागा उपलब्ध झाल्यास तातडीने शुध्दीकरण केंद्र उभे केले जाईल.

### शेकापमुळेच गावात पाणी

कुंडलिका तीराजवळ गावे, वाड्या असतानाही अनेक गावे पाण्यापासून वंचित आहेत. शेतकरी कामगार पक्षाचे नेते माजी आ. पंडित पाटील यांच्यामुळे भातसई गावामध्ये पाणी आले आहे. शेणवई आदिवासीवाडीमध्येदेखील पाणी शेतकरी कामगार पक्षामुळेच आले असल्याचे तेथील ग्रामस्थांनी सांगितले.

रोहा तालुक्यातील पडम, खारापटी, निडी, भातसई, झोळांबे, झोळांबे कोपरे, लक्ष्मीनगर, पान ७ वर

# तटकरेंवर शिंदे गटाची नाराजी

## श्रीवर्धन मतदारसंघात काम न करण्याच्या तयारीत

| आंबेत | वार्ताहर |
रायगडमध्ये महायुतीतील वाद चव्हाट्यावर येत आहेत. दोनच दिवसांपूर्वी कर्जतचे शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी तटकरेंवर जोरदार हल्लाबोल केला होता. यावेळी त्यांनी तटकरेंच्या डीएनएतच गद्दारी असल्याचे म्हटले आहे. या वादाचे पडसाद आता श्रीवर्धनमध्ये दिसून येऊ लागले आहेत. तटकरे महायुतीमध्ये युतीधर्म न पाळता कर्जतमध्ये राष्ट्रवादीच्या सुधाकर घारे यांना पाठिंबा देत असतील, तर आम्ही श्रीवर्धनमध्ये अदिती तटकरेंचे काम करणार नाही, असा इशारा शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी दिला आहे.

शिंदे गटाचे रायगड जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर आणि तटकरे परिवार हा वाद कायम सुरू असल्याच चित्र आहे. घोसाळकर यांनी श्रीवर्धन मतदारसंघातून उमेदवारी लढण्याची दर्शविलेली तयारी यामुळे तटकरे आणि त्यांच्यात शाब्दिक वाद रंगला आहे. शिवाय, कर्जत खालापूर मतदारसंघातील राष्ट्रवादी अजित पवार गट विरूद्ध शिंदे गट या वादाचे पडसाद या मतदारसंघात पडत आहेत. कर्जतमधून राष्ट्रवादीच्या सुधाकर घारे यांनी आमदार थोरवे यांना दिलेले आव्हान यामुळे घोसाळकर यांनीसुद्धा युतीधर्म पालन होत नसल्याने तटकरे यांनादेखील या मतदारसंघातून आव्हान दिलं आहे. त्यामुळे मंत्री आदिती तटकरे यांचं काम शिंदे गटाचे कार्यकर्ते करतील का, हे मोठे प्रश्नचिन्ह आहे. आदिती तटकरे यांच्या प्रचार कार्यालयाचेदेखील काल श्रीवर्धनमधील बोर्लीमध्ये उद्‍घाटन करण्यात आले. यावेळी शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांची अनुपस्थिती पाहायला मिळाली. यावरून या दोघांमध्ये अंतर्गत धुसपूस सुरू आहे. याचा फटका उमेदवाराला पडल्यास प्रतिस्पर्धी उमेदवाराला याचा फायदा होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

श्रीवर्धन मतदारसंघात महाविकास आघाडीकडून शरद पवार गटाने ओबीसी समाजाचे अनिल नवगणे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर, बळीराज सेनेकडून कृष्णा कोबनाक यांना उमेदवारी दिली. तर, पान ७ वर

# आ. गोगावलेंनी घेतला धसका

- पहिल्या क्रमांकावर बसपा उमेदवाराला मिळाले स्थान
- महायुती विरुद्ध महाविकास आघाडीत होणार थेट लढत

| महाड | प्रतिनिधी |
महाड माणगाव पोलादपूर विधानसभा मतदारसंघामध्ये आता निवडणुकीच्या रिंगणामध्ये आठपैकी पाच उमेदवार शिल्लक राहिले आहेत. या पाच उमेदवारांमध्ये वर्णमालेनुसार बहुजन समाज पार्टीच्या उमेदवाराचे नाव मतदान यंत्रामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. याचा धसका उमेदवार गोगावलेंनी घेतला आहे. या बटणाचा तोटा होईल, त्यामुळे आपले नाव पहिल्या क्रमांकावर असावे यासाठी गोगावलेंनी मेहनत घेतली, परंतु त्याला यश आले नाही, त्यामुळे त्यांनी मोठा धसका घेतल्याची जोरदार चर्चा मतदारसंघात सुरू आहे.

महाड माणगाव पोलादपूर विधानसभा मतदार संघांमध्ये महायुती आणि महाविकास आघाडी या दोन युतीमधील उमेदवारांमध्ये लढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. महाडमध्ये महाराष्ट्रात सगळ्यात कमी उमेदवार संख्या आहे. आठपैकी आता केवळ पाच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यामुळे महायुती पान ७ वर



# एकजूट व्हा, युती सरकार घालवा

## जयंत पाटील यांचे आवाहन

| अलिबाग | प्रतिनिधी |
शेतकरी कामगार पक्ष व काँग्रेस पक्षातील मंडळी वेगळी भूमिका घेऊन काम करणारी आहेत. महाविकास आघाडीच्या माध्यमातून आज एका विचाराचे पक्ष एकत्र आले आहेत. या निवडणुकीत चित्रलेखा पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. युतीचे सरकार घालविण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. एक वेगळ्या पद्धतीने काम करून पुन्हा आघाडीच्या विरोधात उभे राहण्याची हिंमत नाही झाली पाहिजे, असे प्रतिपादन शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी शुक्रवारी (दि. ८) केले.

महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचारार्थ अलिबागमधील काँग्रेस भवनमध्ये तालुका काँग्रेस कमिटीची आढावा बैठक शुक्रवारी घेण्यात आली. यावेळी जयंत पाटील बोलत होते.

यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, नृपाल पाटील, काँग्रेसचे राज्य प्रदेश सचिव ॲड. प्रवीण ठाकूर, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रमेश नाईक, रवींद्र उर्फ काका ठाकूर, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील थळे, ॲड. उमेश ठाकूर, रविना ठाकूर, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भास्कर चव्हाण, योगेश मगर आदी महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी जयंत पाटील म्हणाले की, विधिमंडळात काँग्रेसच्या बाजूने शेतकरी कामगार पक्षाची भूमिका कायमच राहिली आहे. राज्याच्या विधानसभेमध्ये अलिबागच्या आमदाराची एक वेगळी ओळख आहे. काँग्रेससह शेकापच्या अनेक दिग्गज मंडळींनी आमदार म्हणून विधानसभेत काम केले आहे. परंतु, त्यांचा एक वेगळा विचार होता. त्यांना सन्मानाची वागणूक होती. परंतु, हा सन्मान जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे टक्केवारी घेणाऱ्या आमदारांना घरी बसवून उच्चशिक्षित व सर्व क्षेत्रात चांगली कामगिरी करणाऱ्या चित्रलेखा पाटील यांना आमदार म्हणून पाठवा, असे पान ७ वर



### ‘पंजाची साथ असेल, तर विजय निश्चित’

काँग्रेस हा एक वेगळ्या विचारांचा पक्ष आहे. या पक्षामधील गांधी कुटुंबातील दोन नेत्यांनी दिलेले बलिदान विसरता कामा नये. या निवडणुकीत पंजा पाठीशी असेल, तर विजय हा नक्कीच असेल, असे प्रतिपादन महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी केले. त्या पुढे म्हणाल्या की, भविष्यात राहुल गांधी पंतप्रधान असतील, गोरगरीबांना न्याय देणारे ते नेते आहेत. आज समाजात तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्याचा गैरवापर करीत समाजात गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधक करीत आहेत. संगणक, मोबाईल गांधी कुटुंबियांनी देशात आणला, हे विसरता कामा नये. त्यांच्यामुळे देशाची खरी प्रगती झाली आहे, याची जाणीव प्रत्येकाला असणे आवश्यक आहे. सर्वांचे लाडके पप्पा म्हणजे माजी आ. मधुकर ठाकूर यांनी माणुसकी व सच्चा विचार घेऊन काँग्रेसचे काम केले. तळागाळातील सर्व घटकांपर्यंत पोहोचून गोरगरीबांसाठी त्यांनी काम केले. तालुक्यात जे राजकारण सुरु आहे, ते अतिशय भयावह आहे. जी कीड लागली आहे, ती काढून टाकण्याची वेळ आली आहे. त्यांना चिखलात लोळविण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन चित्रलेखा पाटील यांनी केले.

### चित्रलेखा पाटील यांचे काँग्रेसभवनमध्ये स्वागत

महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांचे शुक्रवारी दुपारी काँग्रेसभवनमध्ये आगमन होताच, फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. काँग्रेसच्या वतीने त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. चित्रलेखा पाटील यांच्या प्रचाराच्या निमित्ताने महाविकास आघाडीतील घटक पक्ष असणाऱ्या काँग्रेसकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी विजयाचा जयघोष करण्यात आला.

### चित्रलेखा पाटील यांना आमदार करण्यासाठी सज्ज व्हाः ॲड. प्रवीण ठाकूर

देशासह व राज्यातील नको ती घाण आहे, ती काढण्याची गरज आहे. वेगवेगळ्या वस्तूंच्या किमती भरमसाठ वाढल्या आहेत. त्याचा फटका सर्वसामान्यांना बसत आहे. खऱ्या विकासासाठी महाविकास आघाडीच्या माध्यमातून एकत्र आलो याचा आनंद आहे. अनेकांनी आमिष दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, आम्ही निष्ठावंत आहोत, हाताला हात घालून काम करणारे कार्यकर्ते आहोत. महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांना भरघोस मतांनी निवडून देऊ. त्या आमदार व्हाव्यात, सर्व सामान्यांचे प्रश्न सोडवावेत, ही अपेक्षा आहे, असे काँग्रेसचे प्रदेश सचिव ॲड. प्रवीण ठाकूर यांनी केले.

# भीमशक्ती चिऊताईंच्या पाठीशी

| अलिबाग | प्रतिनिधी |
महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना भीमशक्ती या सामाजिक संघटनेने जाहीर पाठिंबा दिला आहे. अलिबाग, मुरूड, रोहा विधानसभा मतदारसंघातील तमाम जनतेने चिऊताई यांना निवडून द्यावे, असे आवाहन त्यांच्याकडून करण्यात आले आहे.

बहुजनांच्या न्याय व हक्कासाठी धर्मनिरपेक्षपणे लढणारी भीमशक्ती ही सामाजिक संघटना आहे. राज्यसभा खासदार, माजी सामाजिक न्यायमंत्री तथा संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत हंडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्याच्या वतीने महाविकास आघाडीतील घटक पक्ष शेतकरी कामगार पक्षाच्या अलिबाग, मुरूड व रोहा विधानसभा मतदारसंघाच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्यातील सर्व आंबेडकरी जनतेने ‘शिट्टी’ या निशाणीसमोरील बटण दाबून चिऊताई यांना प्रचंड मतांनी मतदान करून विजयी करा, असे आवाहन भीमशक्ती संघटनेच्या वतीने करण्यात आले. या पाठिंब्याचे पत्र चित्रलेखा पाटील यांना देण्यात आले. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेश वाघमारे, उपाध्यक्ष अनिल मोहिते, सरचिटणीस पान ७ वर

**आजचा अग्रलेख**
**तिजोरीची आठवण**

## वे|ध|क

### चिऊताई यांचा आज प्रचार दौरा

**अलिबाग :** महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. सुडकोली, रामराज, बोरघार, चिंचोटी या भागात शनिवारी (दि. ९) दुपारी चार वाजल्यापासून प्रचाराला सुरुवात होणार आहे. दरम्यान, येथील कार्यकर्ते व मतदार यांना भेटून त्यांच्याशी त्या संवाद साधणार आहेत.

### कामाचे पैसे मागण्यावरुन वाद

**माणगाव :** गावातील साफसफाईचे पैसे मागितल्याच्या राग आल्याने मारहाण शिवीगाळ करून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना विळे विभागातील बेडगाव येथे घडली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सविस्तर वृत्त असे की, फिर्यादी महादेव शिंदे व आरोपी काशिराम शिंदे हे नात्याने चुलत भाऊ असून, आरोपी प्रमोद शिंदे, प्रफुल्ल शिंदे हे नात्याने पुतणे आहेत. फिर्यादी महादेव शिंदे यांनी प्रफुल्ल शिंदे यांच्याकडे गावातील साफसफाईच्या कामाचे पैसे मागितले असता त्या गोष्टीचा राग येऊन आरोपी प्रफुल्ल व काशिराम यांनी संगनमत करून फिर्यादी यास हाताबुक्क्याने मारहाण करीत शिवीगाळ करून जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

# शिंदेच्या पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

**रुपेश पाटील यांच्या मनमानी कारभाराचा निषेध**



| उरण | वार्ताहर |
उरण विधानसभा मतदारसंघात सर्वच पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी निवडणुकीच्या कामाला लागले आहेत. सर्वत्र जोरात प्रचार सुरू असताना शिवसेना शिंदे गटात पदाधिकाऱ्यांमध्ये जोरदार संतापाची लाट उसळली आहे. शिवसेनेचे वरिष्ठ पदाधिकारी रुपेश पाटील यांच्या एकतर्फी, मनमानी व हुकूमशाही कारभाराला कंटाळून पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सामूहिक राजीनामे दिले.

शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता सर्व व्यवहार चालू असल्याने रुपेश पाटील यांच्या मनमानी कारभाराचा निषेध व्यक्त करत उरण विधानसभा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामे दिले आहेत. यामध्ये कृष्णा बा. पाटील, राजन श. म्हात्रे- संपर्क प्रमुख उलवे, भरत देशमुख- उलवे शहर प्रमुख, अमित कमळाकर ठाकूर उपतालुका प्रमुख उरण तालुका, प्रभाकर पाटील - विभागीय प्रमुख गव्हाण (उलवे), विजय पाटील विभाग प्रमुख चिरनेर, सचिन पाटील समन्वयक उरण तालुका, अनंता गडकरी शाखा प्रमुख बामण डोंगरी, संतोष मोकल शाखा प्रमुख तरघर, सचिन देशमुख शाखा प्रमुख खारकोपर, ज्ञानेश्वर पाटील शाखा प्रमुख मोरावे, रामदास पाटील संघटक वहाळ ग्रामपंचायत, धनंजय कोळी मोहा शाखा प्रमुख, अतिष ठाकूर शाखा प्रमुख उलवे सेक्टर १९, प्रसाद पाटील शाखा प्रमुख उलवे सेक्टर ५/६, सुरेंद्र ठाकूर जसखार शाखा प्रमुख यांचा समावेश आहे. या सर्वांनी आपल्या पदाचा सामूहिक राजीनामा दिला आहे.

गेली दोन वर्षे आम्ही सर्व पदाधिकारी व शिवसैनिक पान ७ वर

# बालदींविरोधात आगरी समाज आक्रमक

| उरण | प्रतिनिधी |
महेश रतनलाल बालदी यांनी आगरी समाजाबद्दल अवमानकारक शब्द वापरल्याप्रकरणी त्यांचा निषेध करण्यासाठी आणि त्यांनी समाजाची जाहीर माफी मागावी या मागणीसाठी मंगळवारी (दि. १२) उरण पोलीस ठाण्यात आगरी समाजाच्या वतीने मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सुधाकर पाटील यांनी दिली.

उरण विधानसभा क्षेत्रात भाजपातर्फे निवडणूक लढविणारे उमेदवार महेश रतनलाल बालदी हे आगरी समाजाबद्दल वारंवार अवमानकारक शब्दप्रयोग करत आहेत. मागच्या विधानसभा निवडणूक काळातही त्यांनी आगरी समाजातील पान ७ वर

# ईडीच्या भीतीने भाजपसोबत गेलो



- **छगन भुजबळ यांचा गौप्यस्फोट**

| मुंबई | प्रतिनिधी |
भाजपसोबत गेलो म्हणून आमच्या सहकाऱ्यांना खूप आनंद झाला असे विधान छगन भुजबळ यांनी केले आहे. तसेच ईडीपासून सुटका मिळावी म्हणूनच भाजपसोबत केले असेही भुजबळ म्हणाले. ऐन निवडणुकीच्या धामधुमीत भुजबळांच्या या विधानाने एकच खळबळ उडाली आहे.

पत्रकार आणि लेखक राजदीप सरदेसाई यांचं नुकतंच एक पुस्तक ‘२०२४: द इलेक्शन देंट सरप्राइज्ड इंडिया’ प्रकाशित झाले आहे. या पुस्तकात सरदेईसाई यांनी ईडीवर एक प्रकरण लिहिले आहे. यात भुजबळ म्हणाले की, आम्ही भाजपसोबत युती केल्यामुळे अनेक नेत्यांना आनंद झाला. कारण अनेकांची ईडीपासून सुटका झाली होती. ईडीपासून सुटका झाल्याने सर्वांनीच सुटकेचा निःश्वास टाकला. माझी ईडीपासून सुटका झाली, मला वाटलं माझा पुर्नजन्मच झाला.

मी ओबीसी असल्याने ईडीसारख्या यंत्रणा माझ्या मागे लागल्या होत्या. मी उच्च जातीचा असतो तर मला असे पान ७ वर

**निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड पोलिसांची कारवाई**

# गुन्हेगारीविरोधात ‘मिशन ऑलआउट’

## अवैध धंदेवाल्यांना दणका, नाकाबंदी लावून वाहनांची तपासणी



| अलिबाग | प्रतिनिधी |
विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड पोलिसांनी गुरुवारी (दि. ७) रात्री मिशन ऑलआउट मोहीम हाती घेतली. अवैध धंद्यावर आळा बसविण्यासाठी, तसेच कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी हे मिशन राबविले. या झाडाझडतीमध्ये दारु विक्री करणाऱ्यांपासून अनेक हॉटेलांवर छापे टाकण्यात आले. तसेच वाहतुकीचे नियम मोडणारे व काही संशयितांविरोधातदेखील कारवाई करण्यात आली. या मिशनमुळे अवैध धंदे चालविणाऱ्यांना दणका देण्यात आला.

जिल्ह्यात सात विधानसभा मतदारसंघांमध्ये निवडणूक होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर रायगड पोलीस कामाला लागले आहे. गावागावात रुट मार्च घेऊन गैरप्रकार करणारे व कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात गुरुवारी रात्री मिशन ऑल आऊट सुरु करण्यात आले. रात्री आठ वाजल्यापासून सकाळी सहा वाजेपर्यंत हे मिशन जिल्ह्यातील अलिबाग, मांडवा अशा एकूण २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत राबविण्यात आले. गुन्हेगारी कृत्यांवर आळा घालण्याच्या उद्देशाने निवडणुकीच्या निमित्ताने ऑल आऊट मिशन सुरु केले.

गावागावात जाऊन पोलिसांनी माहिती घेण्यास सुरुवात केली. हॉटेल, लॉज, रिसॉर्टची तपासणी करण्यात आली. दारुचा साठा ठेवणारे, वाहतुकीचे नियम मोडणारे तसेच काही पान ७ वर

> “निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी मिशन ऑल आऊट सुरू करण्यात आले आहे. संशयित वाहनांची तपासणी करण्याबरोबरच हॉटेल, लॉज याठिकाणीदेखील जाऊन पाहणी केली. वॉरंट आणि समन्स काढण्यात आलेल्या आरोपींना शोधण्यात देखील यश आले आहे.”
> – विनित चौधरी, उपविभागीय पोलीस अधिकारी, अलिबाग




# सावंतवाडीत चौरंगी लढत

## ■ बंडखोरीमुळे दीपक केसरकरांच्या आव्हानांत वाढ

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी विधानसभा मतदारसंघात यंदाच्या निवडणुकीत अत्यंत रंगतदार लढत रंगण्याची चिन्हे आहेत. एकीकडे शिवसेना शिंदे गटातील नेते आणि मंत्री दीपक केसरकर हे चौथ्यांदा विजयी षटकार ठोकण्याच्या उद्देशाने निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. मात्र, यावेळी त्यांच्यासमोर काही आव्हानं आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांविरोधात महायुती आणि मविआमधून एकेका इच्छुक उमेदवाराने बंडखोरी केल्याने इथली समीकरणं आता बदलली आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीत सावंतवाडीमध्ये महायुतीकडून शिंदे गटाचे दीपिक केसरकर यांच्याविरुद्ध ठाकरे गटाचे राजन तेली अशी मुख्य लढत होती. पण, इच्छुक उमेदवारांच्या बंडखोरीमुळे या मतदारसंघात चौरंगी लढत पहायला मिळणार आहे. महायुतीमधील भाजपाकडून निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेले नेते विशाल परब आणि मविआमधील शरद पवार गटाकडून निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या अर्चना घारे परब या दोघांच्या बंडखोरीमुळे सावंतवाडीतील निवडणूक आता चौरंगी झाली आहे.

सावंतवाडी मतदारसंघातून दीपक केसरकर हे सलग तीन वेळा निवडून आले आहेत. २००९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडून आणि त्यानंतर २०१४, २०१९ मध्ये शिवसेनेकडून ते विधानसभेवर निवडून गेले. शिवसेनेनं १९९९ पासून इथं आपली पकड मजबूत केली. अडीच वर्षांपूर्वी जेव्हा शिवसेनेत फूट पडली, तेव्हा केसरकर यांनी शिंदे गटात प्रवेश केला. यावेळी ते चौथ्यांदा निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. मतदारसंघातील जनतेवर असलेला प्रभाव, तगडा जनसंपर्क आणि विकासकामांमधून जोडलेला समर्थक वर्ग या सर्व केसरकरांच्या जमेच्या बाजू आहेत. मात्र सलग १५ वर्षे मतदारसंघाचं प्रतिनिधित्व आणि साडेसात वर्षे मंत्रिपद भूषवल्यानंतरही इथल्या काही समस्या सोडवण्यात त्यांना अपेक्षित यश मिळालं नाही. त्यामुळे काही प्रमाणात त्यांच्याविरोधात नाराजीसुद्धा आहे.

सावंतवाडी मतदारसंघात दीपक केसरकर यांच्याविरोधात ठाकरे गटाने राजन तेली यांना उमेदवारीचं तिकिट दिलं आहे. राजन तेली हे भाजपामध्ये होते. मात्र सावंतवाडीची जागा महायुतीमध्ये शिंदे गटाला सुटणार हे निश्चित होताच ते ठाकरे गटात दाखल झाले. त्यानंतर त्यांना ठाकरे गटाकडून उमेदवारी मिळाली. गेल्या दोन निवडणुकांमध्येही तेली यांनीच केसरकर यांना आव्हान दिलं होतं. मात्र केसरकर यांचा पराभव करण्यात त्यांना यश मिळालं नाही. यंदाच्या निवडणुकीत त्यांनी केसरकर यांना घेरण्याची चांगलीच तयारी केली आहे. केसरकरांवर नाराज असलेला मतदार या निवडणुकीत राजन तेलींच्या बाजूने वळण्याची दाट शक्यता आहे. त्यातही राजन तेली हे मूलचे कणकवलीचे असल्याने त्यांच्यासाठी बाहेरचा उमेदवार हा शिक्का अडचणीत आणणारा ठरू शकतो.

दीपक केसरकर आणि राजन तेली यांच्याशिवाय दोन अपक्ष उमेदवार निवडणुकीत उभे राहिल्याने आणखी रंगत आली आहे. यातील पहिले अपक्ष उमेदवार हे भाजपाचे बंडखोर नेते विशाल परब आहेत. यंदाच्या निवडणुकीसाठी ते गेल्या काही महिन्यांपासून जोरदार तयारी करत आहेत. स्वत:ला मतदारांशी जोडून घेण्यासाठी ते विविध प्रयत्न करत आहेत. मात्र भाजपाने ही जागा शिंदे गटाला सोडल्याने त्यांनी बंडखोरीचा निर्णय घेतला. अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करताना त्यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केलं होतं. युवा नेता असल्याने सावंतवाडीतील तरुण मतदार त्यांच्याकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय विशाल परब यांच्यावर निलंबनाची कारवाई झाली असली तरी भाजपामधील एका वर्गाचा त्यांना पाठिंबा आहे. त्यामुळे दीपक केसरकर यांच्यासाठी परब हे डोकेदुखी ठरू शकतात. इथेही नारायण राणे यांची भूमिका महत्त्वाची ठरते. राणे आणि त्यांचे समर्थक विशाल परब यांच्याविरोधात असल्याने त्यांच्यासाठी ही बाब अडचणीची ठरू शकते.

या मतदारसंघात महायुतीप्रमाणेच महाविकास आघाडीमध्येही बंडखोरी झाल्याचं पहायला मिळालं. गेल्या अनेक वर्षांपासून सावंतवाडी मतदारसंघातून उमेदवारी मिळावी यासाठी इच्छुक असलेल्या शरद पवार गटाच्या अर्चना घारे परब यांनीही इथे बंडखोरी केली आहे. मविआमध्ये मतदारसंघाची जागा ठाकरे गटाला गेल्यानंतर त्यांनी ही बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज भरला. विविध सामाजिक कार्यातून त्यांनी सावंतवाडीत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.



### चौरंगी लढतीत मतविभाजन

**दीपक केसरकर आणि राजन तेली हे दोन प्रमुख उमेदवार आणि विशाल परब, अर्चना घारे परब हे दोन तुल्यबळ अपक्ष उमेदवार अशा चौरंगी लढतीत मतांचं विभाजन टाळता येणार नाही. महायुती आणि मविआमध्ये बंडखोरी झाल्याने मतांची गणितं बदलण्याची दाट शक्यता आहे.**

# ५ लाख द्या, ईव्हीएम हॅक करतो

## ■ उमेदवाराकडे खंडणी मागणारा अटकेत

**। नाशिक ।वृत्तसंस्था ।**

ईव्हीएम मशीन हॅक करून तुम्हाला विजयी करून देतो. त्यासाठी ४२ लाख रुपये लागतील. पैसे न दिल्यास मशीन सेट करणारे माझ्या ओळखीचे असून त्यांना सांगून तुमचा पराभव निश्चित असल्याचे सांगत उमेदवाराकडून ५ लाख रुपयांची खंडणी मागितली. या भामट्याला पोलिसांनी ४ तासांत ताब्यात घेतले. निवडणुकांमध्ये पैसे कमवण्याची संधी पाहून आपण हा प्रकार केल्याचे आरोपीने कबूल केले. या घटनेनं खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भगवानसिंग चव्हाण असं आरोपीचं नाव असून तो मूळचा राजस्थानचा आहे. तो सध्या नाशिकच्या म्हसरूळ परिसरात रोजगाराच्या निमित्ताने राहतोय. त्याने नाशिकमध्ये आमदार वसंत गीते यांच्या कार्यालयात जाऊन कार्यालयातील आनंद शिरसाठ यांना मी तुम्हाला ईव्हीएम मशीन हॅक करून १० मतदानापैकी ३ ते ४ मते तुम्हाला मिळवून देऊन निवडणुकीमध्ये जिंकून देतो. बदल्यात ४२ लाख रुपये लागतील, असे सांगितले. त्यापैकी ५ लाख आता द्यावे, अशी मागणी केली. पदाधिकाऱ्यांनी पैसे देण्यास नकार दिला. त्यानंतर पैसे न दिल्यास प्रोग्रामिंग करणारे माझे ओळखीचे आहेत. मशीन हॅक करून तुमचा उमेदवार पराभूत करेन, अशी धमकी त्याने दिली. त्यानंतर तो पत्ता सांगून निघून गेला. शिरसाठ यांनी याप्रकरणी बुधवारी मुंबई नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केल्यानंतर पोलिसांनी भगवानसिंगला ताब्यात घेतले आहे. यानंतर आता पोलीस आरोपी भगवानसिंगची चौकशी करत आहेत. तसेच त्याच्यासोबत अजून कुणी आहे का? याचा तपास करत आहेत. आरोपीला अटक केली असली तरी या घटनेनं परिसरात खळबळ उडाली आहे.



# मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी उपक्रम

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा, नागरिकांनी मतदान करण्यासाठी उत्स्फुर्तपणे पुढे यावे. लोकशाही अधिक बळकट करावी यासाठी प्रशासनाकडून विविध उपक्रम राबवले जात आहे. यासाठी पथनाट्यातून जिल्ह्यातील अनेक भागात नागरिकांचे प्रबोधन केले जात आहे. प्रत्येकाचे मत किती मोल्यवान आहे. प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावावा याबाबात नागरिकांच्यात जागृती केली जात आहे. त्याचबरोबर शाळा, महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी प्रभातफेरी काढून मतदाना करण्याबाबत नागरिकांचे प्रबोधन करत आहे. त्याचबरोबर प्रशासन पातळीवरही अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून मतदारांचे प्रबोधन केले जात आहे.



# प्रचारात सहभागी झाल्यास कारवाई

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

राज्यातील कृषी विद्यापीठे आणि महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राजकीय पक्षांच्या निवडणूक प्रचारात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग घेतल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. या बाबतचे निर्देश उच्च शिक्षण विभागाने राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांना दिले आहेत.

सध्या राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू आहे. त्यानुसार आचारसंहिता नियमाचे पालन करण्याबाबतचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. राज्यातील विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकेतर अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सामायिक परिनियम अस्तित्वात येईपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदी लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा राजकारणात भाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य होता येणार नाही. त्यांच्याशी संबंध ठेवता येणार नाही किंवा कोणत्याही राजकीय चळवळीत किंवा कामात कोणत्याही प्रकारे भाग घेता येणार नाही अथवा सहाय्य करता येणार नाही, असे परिपत्रकात नमूद केले आहे.

# लातूर ग्रामीण मतदारसंघात काँग्रेसकडून जोरदार प्रचार

**। लातूर । वृत्तसंस्था ।**

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार धीरज देशमुख निवडणुकीच्या रिंगणात आहेत. काँग्रेसने निवडणूक जाहीर होण्याअगोदरपासून हा मतदारसंघ पिंजून काढला. आमदार धीरज देशमुख यांच्यासह माजीमंत्री दिलीपराव देशमुख, वैशालीताई देशमुख, दीपशिखा देशमुख आदींनी गावोगाव गाठीभेटी-मेळावे घेऊन वातावरण निर्मिती केली. पहिल्या टप्प्यात काँग्रेसने आघाडी घेतली आहे. भाजपला सूर गवसला नसल्याने पक्षाच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो. काँग्रेस जो उमेदवार देईल, तोच उमेदवार या मतदारसंघात निवडून येतो, हा इतिहास आहे. लातूर तालुक्यासह रेणापूर तालुका आणि औसा तालुक्यातील २७ गावे मिळून हा मतदारसंघ तयार झालेला आहे. त्यामुळे या तिन्ही तालुक्यांत झालेली विकासकामे आणि जनतेशी असलेला थेट संपर्क यांच्या जोरावरच काँग्रेसने सलग तीन वेळा जिंकली आहे.

लातूर ग्रामीणला यंदा तुल्यबळ लढत ,काँग्रेसविरुद्ध भाजप विधानसभा निवडणुकीच्या मैदानात मांजरा परिवारातील साखर कारखान्यांच्या माध्यमातून या भागाचा कायापालट झाला आहे. कोट्यवधींची विकासकामे झाली आहेत.

विकासकामे आणि विविध कार्यांतून देशमुख सातत्याने मतदार आणि गावांच्या संपर्कात आहेत. आता निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गावोगाव गाठीभेटी, नागरिकांशी थेट संवाद, महिला मेळावे, आदी माध्यमातून काँग्रेस पक्षाचे उमेदवार धीरज देशमुख, माजीमंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांशी थेट संवाद साधत आहेत. तसेच वैशालीताई देशमुख, दीपशिखा देशमुख यांनीही गावोगाव महिलांशी संवाद साधला आहे.

# सांगलीतील काँग्रेसअंतर्गत बंडखोरीमागे षडयंत्र

**। सांगली । वृत्तसंस्था ।**

सांगली विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसअंतर्गत बंडखोरीचे षडयंत्र भाजपकडून गेली सहा महिने शिजत होते, असा आरोप काँग्रेसचे उमेदवार पृथ्वीराज पाटील यांनी केला. निवडणूक नियोजनासाठी महाविकास आघाडीच्या घटक पक्षांतील पदाधिकाऱ्यांची व प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक मंगळवारी रात्री पार पडली. या वेळी पाटील बोलत होते.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) शहर जिल्हाध्यक्ष संजय बजाज, राहुल पवार, शिवसेना ठाकरे गटाचे शंभोराज काटकर, शेकापचे अजित सूर्यवंशी, सनी धोतरे, अमृता चोपडे आदी उपस्थित होते. पाटील म्हणाले, काँग्रेसमधील बंडखोरी टाळण्यासाठी प्रयत्न झाले. पाटील यांना विधान परिषदेवर संधी देण्याची तयारीही दर्शवली. आ. कदम यांनी बंडखोरी टाळण्याचे प्रयत्न केले. मात्र टाळता आली नाही. बंडखोरीसाठी भाजपकडून गेल्या सहा महिन्यापासून प्रयत्न सुरू होते.

राज्यात पक्ष फोडीचा पॅटर्न राबविणाऱ्या भाजपने सांगलीत तोच कित्ता गिरवला आहे. हा डाव जनताच हाणून पाडेल. या स्थितीत कार्यकर्त्यांवर दबाव आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. या माध्यमातून भाजपला मदत करण्याचा हेतू स्पष्ट होत असल्याचे दिसते. सांगलीतील जनता आता भाजपला आणि सुधीर गाडगीळ यांना कंटाळली आहे. यामुळे महाविकास आघाडीचा विजय निश्चित आहे.

यावेळी बोलताना बजाज म्हणाले, गेली दहा वर्षे पाटील सांगलीतील जनतेच्या हक्कासाठी संघर्ष करत आहेत. विरोधक कसा असावा, सरकारला रस्त्यावर उतरून जाब कसा विचारावा हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. सामान्यांसाठी रस्त्यावर उतरणारा जर लोकप्रतिनिधी सांगलीला मिळाला तर निश्चितच मतदारसंघात बदल घडेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



## ■ पृथ्वीराज पाटील यांची बंडखोरांसह भाजपवर टीका

# ‘राहात्यात सुडाचे राजकारण नको’

**संगमनेर :** राहाता तालुक्यातील जनतेला गुलामगिरी व दहशतमुक्त मुक्त करण्यासाठी ही लढाई असल्याचे प्रतिपादन बाळासाहेब थोरात यांनी केले.

मागील साठ वर्ष खासदार, आमदार, मंत्री, जिल्हा परिषद अशी विविध पदे तुमच्याकडे होती. तरीही तुम्हाला औद्योगिक वसाहत करता आली नाही आणि मृत्यूचा सापळा असलेला नगर-मनमाड रस्ताही झाला नाही. राहाता तालुक्यात दहशतीचे व सुडाचे राजकारण आहे. वाळूचे धोरण फसले, तलाठी भरतीमध्ये मोठा भ्रष्टाचार झाला, गोरगरिबांच्या अन्नात माती कालवण्याचे काम या मंडळीने केले असे शेवटी थोरात यांनी सांगितले.

# मतदानासाठी सुट्टी न दिल्यास आस्थापनांवर कारवाई

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई शहर व उपनगरातील सर्व व्यवसाय, व्यापार, उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम तसेच इतर आस्थापनांमध्ये कार्यरत कामगार, कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांना निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी २० नोव्हेंबर रोजी सुट्टी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांच्या मालकांविरोधात कडक कारवाई केली जाईल, अशी इशारा जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी बुधवारी दिला.



भारत निवडणूक आयोग तसेच मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या सूचनांनुसार मुंबई शहर व उपनगरांत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर, मुंबई शहर आणि दोन्ही उपनगरांतील मतदारांना निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी विविध नियम जारी करण्यात आले आहेत. राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मतदानाचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाच्या दिवशी सुट्टी देण्याबाबत गगराणी यांनी आदेश दिले आहेत. सर्व उद्योग समूह, महामंडळ, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना हा नियम लागू होणार आहे. लोक प्रतिनिधीत्व अधिनियमानुसार, एखाद्या मतदाराची नोकरीवरील अनुपस्थिती नोकरीच्या संदर्भात धोकादायक किंवा हानिकारक ठरणार असल्यास मतदारावर उल्लंघनात्मक कारवाई केली जाणार नाही.

### वेतनात कपात करता येणार नाही

**अपवादात्मक परिस्थितीत कामगार, कर्मचारी, अधिकारी आदींना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पूर्ण दिवसाची सुट्टी देणे शक्य नसल्यास त्यांना किमान चार तासांची सवलत देता येईल. मात्र, अशा सवलत प्रकरणांमध्ये जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. दरम्यान, सुटीच्या बदल्यात संबंधित व्यक्तीच्या वेतनात कोणत्याही प्रकारची कपात करता येणार नाही. या नियमांचे किंवा तरतुदींचे कोणत्याही आस्थापनाच्या मालकांनी उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.**

सवलत प्राप्त न झाल्याने एखाद्या व्यक्तीला मतदानाचा हक्क बजावण्यापासून वंचित राहावे लागल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित आस्थापनांच्या मालक वा पदाधिकाऱ्यांविरोधात योग्य कारवाई करण्यात येईल. त्यामुळे उद्योग विभागांतर्गत येणारी सर्व महामंडळे, उद्योग समूह, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम आदी आस्थापनांनी जिल्हा निवडणूक प्रशासनाकडून दिलेल्या या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आदेशही गगराणी यांनी दिले.

# राज ठाकरेंची सत्ता कधी येणार नाही

## ■ रामदास आठवलेंची खोचक टीका

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या हाती सत्ता दिली तर एकाही मशिदीवर भोंगा दिसणार नाही, असे वक्तव्य राज ठाकरे यांनी अमरावती येथे एका जाहीरसभेदरम्यान केले होते. या वक्तव्यावर आता राजकीय प्रतिक्रिया येत आहेत. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) प्रमुख रामदास आठवले यांनी एएनआय वृत्तवाहिनीशी बोलताना राज ठाकरेंच्या विधानावर टीका केली. मशिदीवरील भोंगे कधीही हटणार नाहीत, अशी भूमिका मांडत असताना रामदास आठवले यांनी मनसेची सत्ता कधीही येणार नाही, असे सांगितले. मनसेचा एकच आमदार निवडून येतो, तोही स्वतः च्या जीवावर निवडून येतो, असेही आठवले म्हणाले.



रामदास आठवले एएनआयशी बोलताना म्हणाले की, राज ठाकरे वारंवार अशाप्रकारचे विधान करत असतात. आमचे सरकार आले तर मशिदीवरील भोंगे हटविणार असे ते म्हणतात. पण मशिदीवरील भोंगे हटणार नाहीत आणि राज ठाकरेंची सत्ताही कधी येऊ शकत नाही. कितीही वर्ष गेले तरी राज ठाकरेंची सत्ता येऊ शकत नाही. त्यांचा एकच आमदार निवडून येतो, तोही स्वतः च्या जीवावर. मग त्यांचे सरकार कसे येणार? आणि ते कसे भोंगे हटवू शकणार?

मी दहशतवादी असलेल्या मुसलमानांचा नेहमीच विरोध केला आहे. पण देशावर, भारताच्या संविधानांवर प्रेम करणारे आणि हिंदूंशी बंधुभाव राखून राहणाऱ्या मुसलमानांचा विरोध करणे ठिक नाही. मशिदीत एक-दोन मिनिटांची अजान होत असते, त्यासाठी भोंगे हटविण्याची काय गरज आहे. भोंगे हटविण्यापेक्षा गरीबी हटवा, भ्रष्टाचार हटवा, जातीयता हटविली पाहिजे. केवळ १४० १४५ उमेदवार उभे करून आमदार निवडून येत नसतात. मनसेचे दोनही आमदार निवडून येणार नाहीत. पण राज ठाकरे असे विधान वारंवार करत राहिले, तर माझा पक्ष भोंगे हटविणाऱ्यांना धडा शिकवल्या राहणार नाही, असेही रामदास आठवले म्हणाले.

# जालन्यात महिला उमेदवार कमी

**जालना :** जिल्ह्यातील परतूर, घनसावंगी, बदनापूर, जालना आणि भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघातून केवळ ७ महिला विधानसभेच्या रिंगणात आहेत. जिल्ह्यातील पाचही मतदार संघात एकूण १०९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. यात केवळ ७ महिला उमेदवार आहेत.

पुरुषांच्या तुलनेत महिला उमेदवारांचा टक्का नगण्य आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणी राजकारणाच्या केंद्रस्थानी आल्या आहेत. सध्या सर्वत्र त्यांचाच बोलबाला असल्याचे दिसत आहे. महिलांचा राजकारणातील टक्का वाढावा, म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या.

मात्र, उमेदवारी देण्याच्या बाबतीत जिह्यातील पाच विधनासभा मतदारसंघात महिलांचा आकडा नगण्य असल्याचे सध्या चित्र आहे.

# भाजपाचा खोटारडेपणा उघडा पाडणार

## ■ काँग्रेस नेत्यांचा इशारा, शनिवारी मुंबईत पत्रकार परिषद

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय जनता पक्षाने वृत्तपत्रात मोठ्या जाहिराती देऊन काँग्रेसशासित कर्नाटक, तेलंगाणा आणि हिमाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीत दिलेल्या गॅरंटी पूर्ण केल्या नाहीत, असा खोटा प्रचार करुन जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. भाजपचे हे फेक नॅरेटिव्ह हाणून पाडण्यासाठी व महाराष्ट्राच्या जनतेसमोर सत्य मांडण्यासाठी हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सुख्खु, तेलंगाणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी व कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया व पब्लिसिटी विभागाचे चेअरमन पवन खेरा मुंबईत पत्रकार घेऊन भाजपचा खोटारडेपणा उघडा पाडणार आहेत.



प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे उद्या शनिवार ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता ही पत्रकार परिषद होणार आहे. काँग्रेस पक्षाने गुरुवारी निवडणूक आयोगाकडे भाजपाविरोधात तक्रार करून कारवाई करण्याची मागणी केली आहे. काँग्रेस विरोधात अपप्रचार करण्याचा भारतीय जनता पक्षाचा हा प्रयत्न असून, काँग्रेस पक्षाकडून त्याला चोख प्रत्युत्तर दिले जात आहे.

गेल्या दहा वर्षांपासून केंद्रात आणि साडे सात वर्ष राज्यात सत्तेत असून सांगण्यासारखे काही काम केले नाही. कामाच्या नावावर मते मिळणार नाहीत, त्यामुळेच भाजपाकडून अफवा पसरवून खोटा प्रचार सुरू आहे. भ्रष्टाचार आणि कमिशनखोरीतून मिळालेल्या शेकडो कोटी रुपयांची उधळपट्टी त्यासाठी सुरू आहे.

पैशाच्या जोरावर महायुतीचा अपप्रचार सुरू आहे. काँग्रेस पक्षाने कर्नाटक, तेलंगाणा व हिमाचल प्रदेश निवडणुकीत दिलेल्या गॅरंटीची अंमलबजावणी सुरू आहे. या तिन्ही राज्यातील कोट्यवधी लोकांना या गॅरंटीचा लाभ मिळत आहे. काँग्रेस शासित राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री भाजपाचा खोटाडरडेपणा उघडा पाडून राज्याच्या जनतेसमोर सत्य मांडणार आहेत.

# खारेपाटात चिऊताईचा डंका

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग-मुरूड आणि रोहा विधानसभा मतदार संघाच्या निवडणूकीसाठी महाविकास आघाडी पुरस्कृत शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई उभ्या राहिल्या आहेत. त्यांनी गावोगावी जाऊन प्रचाराला सुरुवात केली आहे. शुक्रवारी (दि.८) सायंकाळी खारेपाट भागात प्रचार करण्यात आला. चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांचे आगमन होताच, मतदारांसह कार्यकर्त्यांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले. ज्येष्ठ मतदारांसह, तरुण महिला मतदारांकडून त्यांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्यामुळे खारेपाटात चिऊताईचा डंका वाजत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



मविआ पुरस्कृत शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी पेझारी येथे नारळ वाढवून प्रचाराला सुरुवात केली. यानंतर कुर्डूस, अवेटी या भागात प्रचार केला. मुरूडसह अलिबाग तालुक्यातील गावे, वाड्यांमध्ये चित्रलेखा पाटील यांना प्रचारातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. महाविकास आघाडीच्या काँग्रेस, व शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्तेदेखील त्यांच्या प्रचारासाठी मैदानात उतरले आहेत. चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी शुक्रवारी सायंकाळी खारेपाट परिसरात प्रचाराला सुरूवात केली. रेवसपासून कावाडे, हाशिवरे, सारळ, नवखार या भागात







## मतदारांसह कार्यकर्त्यांकडून जल्लोषात स्वागत

घरोघरी जाऊन त्यांनी मतदारांची भेट घेतली. यावेळी खारेपाटातील कार्यकर्ते, मतदारांकडून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी मतदारांचा पाठींबा वाढत असल्याचे पहावयला मिळाले. लडेंगे जितेंगे, शेतकरी कामगार पक्षाचा विजय असो, महाविकास आघाडीचा विजय असो, अशा घोषणा देण्यात आल्या. एक वेगळा उत्साह या प्रचारादरम्यान दिसून आला. प्रचंड मताधिक्यांनी चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांचा विजय होणार, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.





# चित्रलेखा पाटील यांच्या सभांना प्रचंड प्रतिसाद

## विकास कामांवर भर देण्याचे आश्वासन

**। वाघ्रण । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणूकीच्या पाश्वभुमिवर अलिबाग-मुरुड आणि रोहा मतदार संघाच्या महाविकास आघाडी तसेच शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांनी गुरुवारी (दि.७) शहापूर जिल्हा परिषद मतदार संघातील शेखाचे गाव, वाघ्रण, चिंचवली, नारंगी, बहीरिचा पाडा व शिरवली आदी भागात प्रचारदौरा केला. यावेळी प्रत्येक ठिकाणच्या कार्यकर्त्यांनी चित्रलेखा पाटील यांचे जोरदार स्वागत करून सभा घेतल्या.

यावेळी चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी बोलताना सांगितले की, येथील गरजू मुलींना सायकली वाटप केल्या आहेत. नेत्र तपासणी करून मोफत चष्मे वाटप केले आहेत. असेच कार्य पुढेही करत राहू. तसेच, विजयी झाल्यावर येथील महिला व शेतकरी बांधवाच्या समस्या सोडवू, नाट्य परंपरेला हातभार लावू, महिलांना पुढे जाण्यासाठी त्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांना योग्य ती मदत करू. याचसोबत विद्यार्थी



आणि खेळांडूसाठी सहकार्य करून एकूण विकास कामांवर भर देण्याचे आश्वासन चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी दिले आहे. पुढे बोलताना त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, मा. आ. पंडीत पाटील, मा. मंत्री स्वर्गीय मिनाक्षी पाटील यांनी केलेल्या विकास कामांचा उल्लेख देखील केला आहे. याचबरोबर महाविकास आघाडीचे उपस्थित कार्यकर्ते पाठीशी असल्याबदल त्यांचे आभार देखील व्यक्त केले.

यावेळी अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथील साईबाबा मंदिराच्या प्रांगणात झालेल्या सभेत चित्रलेखा पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला अभिवादन करून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक करताना दिपक पाटील यांनी वाघ्रण व खारपेढांबे गावांच्यावतीने चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी मागील पाच वर्षात केलेल्या शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, बचत गट, सामाजीकरण उपक्रम याबद्दल सांगितले. यावेळी, सरपंच राजेंद्र पाटील, ॲड. गौतम पाटील, माजी सरपंच डॉ. प्रेरणा म्हात्रे, अनिल पाटील आदींसह महिला व युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वळवली आदिवासीवाडीतील तरुण शेकापमध्ये

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वळवली येथील आदिवासी वाडीतील असंख्य तरुणांनी शिवसेना शिंदे गटातील कारभाराला कंटाळून शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. महाविकास आघाडी पुरस्कृत शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्ष प्रवेश सोहळा गुरुवारी (दि.७) वेश्वीमध्ये पार पडला.

अलिबागतालुक्यातीलवळवली येथील आदीवासी वाडीतील कार्यकर्ते शिवसेना शिंदे गटात होते. परंतु, शिंदे गटाच्या कारभाराला कंटाळून आदीवासी वाडीमधील शंभरहून अधिक तरुण कार्यकर्त्यांनी शेकापत प्रवेश केला आहे. चित्रलेखा पाटील यांच्याकडून त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी सुडकोलीचे मा. सरपंच जयवंत तांबडकर, मा. उपसरंच संदेश हिराजी वावेकर, नवनवीत पाटील, प्रदिप तांबडकर, खारकर तसेच नवनिर्वाचित कार्यकर्ते उपस्थित होते.

**पनवेल- उरण**

# विधानसभेत शेकापची ताकद दाखवा

## प्रीतम म्हात्रे यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल आणि उरण तालुक्यात शेकापची ताकद मोठी आहे. मात्र, मध्यंतरीच्या काळात काही कारणाने पक्षाची ताकद क्षिण झाली होती. परंतु, शेकापचा कार्यकर्ता लढावू आणि निष्ठावान आहे. या कार्यकर्त्यांनी आता एकजूट दाखवून विधानसभेत पक्षाचा लाल बावटा फडकवावा, असे आवाहन प्रीतम म्हात्रे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना केले आहे. विधानसभा निवडणुकीच्या निमीत्ताने भाताण येथे आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते.

उरण मतदार संघाचे शेकाप उमेदवार प्रीतम म्हात्रे यांनी विधानसभा निवणूक निमीत्ताने पनवेल तालुक्यातील कष्टकरीनगर, पोसरी, नारपोली, गिरवले, सावला, देवलोली, कसलखंड व भाताण या गावांतून निवडणूक प्रचार दौऱ्याचे आयोजन केले होते. यावेळी



निवडणूक दौऱ्यादरम्यान गावागावात त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना प्रीतम म्हात्रे म्हणाले की, आज युवकांना रोजगाराची समस्या भेडसावत आहे. ती सोडवून तालुक्यात विकास घडवून आणायचा असून त्यासाठी आपले प्रामाणिक प्रयत्न आहेत. यासाठी तुम्हा सर्वांची मला साथ हवी आहे आणि मला ती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

पुढे बोलताना म्हणाले की, पनवेल तालुक्यातील पोसरी, मिरवले, नारपोली व सावला या भागात आ. विवेक पाटील यांनी भरीव विकासाची कामे केली आहेत. यानंतर निवडून आलेल्या लोकप्रतिनीधीचे या भागाकडे दुर्लक्ष झाले आहे. यामुळे विकासाची निर्माण झालेली पोकळी आपल्याला भरून काढून तालुक्यातील जनतेला भेडसवणारे प्रश्न सोडवायचे आहेत. यासाठी शिट्टीच्या चिन्हासमोरील बटण दाबून मला संधी द्यावी, असे प्रतिपादन प्रीतम म्हात्रे यांनी केले आहे. तसेच, गावभेटी दरम्यान त्यांनी शिरढोण गावाला भेट देऊन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांना अभिवादन केले. उरण विधानसभा मतदारसंघामध्ये भाजपमुळे अनेक विकासकामे रखडली असून, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचा वाडा व या विभागातील इतर कामे शेतकरी कामगार पक्षामुळेच झाली असल्याचे देखील प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले.

यावेळी विजय म्हात्रे, हेमंत पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण घरत, राम भोईर, सुभाष पाटील, संतोष पाटील, विभागीय चिटणीस नाना मोरे, सरपंच वैशाली भोईर, पांडुरंग मुकादम, कांचन मुकादम, मोहन पवार, सागर भोईर, संग्राम भोपी, भरत भोईर, वासुदेव कर्णे कर, ऋषिकेश भोईर, भारत मुकादम, जगदीश मुकादम, भूषण म्हात्रे, योगेश मुकादम यांच्यासह शेकाप कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# बाळाराम पाटील यांना वाढता पाठिंबा

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल विधानसभा मतदार संघात सध्या प्रचाराचा झंझावात सुरु आहे. महावीकास आघाडीतून शेकापतर्फे निवडणूक लढवत असलेल्या बाळाराम पाटील यांनी प्रचारात आघाडी घेतली असून, संकट काळात साथ देणारा नेता म्हणून बाळाराम पाटील यांना शहरी तसेच ग्रामीण भागातून पाठिंबा वाढत आहे.

पनवेल मतदार संघातील लढत तिरंगी होणार असून शेकाप नेते बाळाराम पाटील, भाजपा आमदार प्रशांत ठाकूर आणि उबाठाच्या लीना गरड हे आमने सामने आहेत. मात्र, या लढतीत बाळाराम पाटील यांचे पारडे जड आहे. पालिका हद्दीतील गावे तसेच विधानसभा क्षेत्रातीक ग्रामीण भागात सध्या मुंबई ऊर्जा प्रकल्पाची कामं सुरु आहेत. शेतकऱ्यांना पूर्व कल्पना न देता अपुऱ्या मोबदल्यात प्रकल्पाकरिता भुसंपादन केले जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. या विरोधात करण्यात आलेल्या आंदोलनात बाळाराम पाटील यांनी सहभाग घेतला होता. मात्र, इतर पक्षीय नेते आंदोलनापासून दूर राहिल्याने प्रकल्प बाधित शेतकऱ्यांचा रोशाला इतर उमेदवारांना सामोरे जावे लागत आहे.

याच सोबत सिडको वसाहतीमध्ये सामील गावांमधील गरजेपोटी घरांचा मुद्दा असो, नैना प्रकल्प ग्रस्तांची आंदोलन असो, कामोठे वसाहती मधील पाणी प्रश्न असो, सध्या गाजत असलेला मालमत्ता कराचा प्रश्न असो या विरोधात पुकारण्यात आलेल्या प्रत्येक आंदोलनात बाळाराम पाटील यांनी हिरहिरीने घेतलेल्या सहभागामुळे बाळाराम पाटील यांना ग्रामीण तसेच शहरी भागातील पाठिंबा वाढत आहे.



# प्रचंड मतांनी निवडून द्या : सुरेश पाटील

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण विधानसभा निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एक दिलाने व जोमाने काम करून प्रीतम म्हात्रे यांना बहुमताने निवडून द्या, असे आवाहन शेकापचे तालुका सहचिटणीस सुरेश पाटील यांनी केले आहे. शेकापक्षाचे उरण विधानसभेचे अधिकृत उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या प्रचारकार्यात सुरेश पाटील यांनी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन गावभेटींवर भर दिला आहे. यावेळी सुरेश पाटील यांनी सांगीतले की, शेतकरी कामगार पक्षाचे काम जनतेच्या हृदयात आहे. शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता हा जडणघडणीने तयार झालेला आहे. त्यामुळे प्रीतम म्हात्रे यांना निवडून देण्यासाठी शेकापक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता हा एक दिलाने आणि जोमाने कामाला लागला असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

**कर्जत-महाड**

# नारीशक्ती इतिहास घडवणार : अस्मिता शिंदे



**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड मतदार संघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार स्नेहल जगताप यांच्या प्रचारार्थ महाड शहरातील सर्वच प्रभागात प्रचार करण्यात येत असून प्रचारात आघाडी घेतली आहे. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे बंटी पोटफोडे यांनी, या मतदार संघातून स्नेहल जगताप या प्रचंड मतांनी विजयी होणार असून ऐतिहासिक विजयाची नोंद नोंदवतील, असे सांगितले. तसेच, काकरतळे शिंदे आळीमध्ये प्रचारादरम्यान अस्मिता शिंदे यांनी, या मतदार संघातील नारीशक्ती इतिहास घडविणार असल्याचे सांगत महिला उमेदवार स्नेहल जगताप या भरघोस मतांनी विजयी होतील. आणि गेल्या १५ वर्षात रखडलेलला विकास पुर्णत्वास नेतील, असा विश्वास व्यक्त केला आहे.

यावेळी जेष्ठ शिवसैनिक सुरेश शिंदे, सुरेश जाधव, रमेश शिंदे, राम पदरत, प्रकाश शिंदे, विठ्ठल राक्षे, शांताराम राक्षे, प्रकाश कुडरकर, रणजित साळी, माजी नगरसेवीका विद्या साळी, अनुराधा डांगे, अस्मिता शिंदे, अक्षय दळवी, संदीप राक्षे, संदेश जाधव तसेच सर्व शिवसैनिक, महिला व पदाधिकारी यांनी पत्रक वाटत प्रचारदौरा पूर्ण केला आहे. तर, नवीपेठसह महात्मा गांधी मार्ग वरील जुना पोस्ट भागात माजी नगराध्यक्ष शिलीमककर, आरती साळुंखे, दिक्षा शिंदे, प्रियांका वाडकर, सुवर्णा नगरकर, आर्ते, समिक्षा गांगण, दिनेश जैन, उमेश साळुंखे, प्रविण नगरकर, प्रशांत पाटिल, आशिष नगरकर, ओंकार वाडकर, मुन्ना शिंदे, बंटी शिंदे, ओम नगरकर, आदित्य साळुंखे यांनी मतदारांना स्नेहल जगताप यांना विजयी करण्याचे आवाहन केले आहे.

तसेच, तांबट आळी प्रभागातील प्रचार फेरीत बंटी पोटफोडे, सचिन आर्ते, विजय तांबट, निलेश आर्ते, सचिन वडके, अभिजित आर्ते, राहुल तांबट, आशिष वडके, रमेश आर्ते, मोहन वडके, निरंजन यादव, शैलेश पाटील, प्रसाद तांबट, दिलीप दांडेकर, विनय खुळे व पुनीत खुळे आदींनी सहभाग घेतला होता.

# तरुणाई क्रांतीची मशाल पेटवणार : स्नेहल जगताप



**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड विधानसभा मतदार संघातील तेलंगे मोहल्ला येथील असंख्य शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला आहे. या पक्षप्रवेशादरम्यान मविआच्या उमेदवार स्नेहल जगताप म्हणाल्या की, खाडीपट्टा विभाग हा माझा बालेकिल्ला आहे. येथील प्रत्येक घरातील मतदारांजवळ माझ्या वडिलांचे जिव्हाळ्याचे नाते होते, म्हणूनच आज प्रत्येक गावात माझे उत्सहात स्वागत होत आहे. येथील तरूणाई नक्कीच क्रांतीची मशाल पेटवून गद्दारांना जाळून टाकेल. आणि हिच तरूण कार्यकर्त्यांची ऊर्जा मला विजयापर्यंत पोहचवेल, असे प्रतिपादन स्नेहल जगताप यांनी केले.

यावेळी, काँग्रेसचे जेष्ठ नेते इब्राहिमशेठ झमाने, महिला तालुका संघटिका वर्षा कालप, महिला उपतालुका संघटिका दिपाली मोरे, उपतालुका प्रमुख मन्सूरभाई ताज, संजय जगताप, स्वानंद कामत, सरपंच विक्रम मालप, संदेश गोठलं, अमीन झमाने, जुहेब देशमुख, जावेदभाई दुस्ते, अविनाश बर्वे, प्रभाकर सागवेकर, ॲड. विशाल गोलांबडे, झीमद खतीब, जाफर झटाम, शहाखालिद पोरे, अस्मा बागवान आदी मान्यवर उपस्थित होते.

# अन्यायाचा बदला घेण्यासाठी मविआ तय्यार

- **नितीन सावंत यांनी गावोगावी भेट देऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत विधानसभा मतदारसंघातील मतदाराला बदल हवा आहे आणि त्यासाठी फक्त महाविकास आघाडीचे कार्यकर्ते जिद्दीने पेटले आहेत. याशिवाय सर्वसामान्य जनता देखील शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर झालेल्या अन्यायाचा बदला घेण्यासाठी तयार झाली आहे. यामुळे ही निवडणूक महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून मीच जिंकणार, असा आत्मविश्वास नितीन सावंत यांनी सावेले जिल्हा परिषद गटाच्या प्रचारादरम्यान बोलताना व्यक्त केला आहे.



महाविकास आघाडीचे उमेदवार नितीन सावंत यांनी कर्जत विधानसभा मतदारसंघात प्रचाराची सुरुवात करताना गावोगावी भेटी देण्यावर भर दिला आहे. या माध्यमातून मतदारसंघातील सर्व बूथवर जावून तेथील मतदारांच्या गाठीभेटी आणि बूथ कमिटी यांची भेटी घेण्यासाठी बूथ संवाद दौरे सुरू केले आहेत. सावेळे जिल्हा परिषद गट हा शिवसेना पक्षाचा बालेकिल्ला राहिला आहे. यामुळे याठिकाणी नितीन सावंत यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे.

यावेळी नितीन सावंत यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना, ही लढाई अन्याय विरुद्ध न्यायाची आहे. शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांची फसवणूक करणाऱ्यांना धडा शिकवण्याची आहे. मी जरी मविआचा उमेदवार असलो तरी खऱ्या अर्थाने पक्षाचे उमेदवार हे शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे, राष्ट्रवादी नेते शरद पवार आणि शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील हेच आहेत. यामुळे कार्यकर्त्यांनी मविआचे मशाल हे चिन्ह घरोघरी पोहचवून जनतेच्या मनातील उद्रेक बाहेर काढण्यासाठी प्रचंड मतांनी निवडून द्या, असे आवाहन केले.

# तिजोरीची आठवण

महायुतीवाल्यांना आता राज्याच्या तिजोरीची काळजी वाटू लागली आहे. महाविकास आघाडीने पंचसूत्री कार्यक्रमात काही आश्वासने देताच युतीवाल्यांना त्यातले खर्च दिसू लागले. आणि, इथला बहुसंख्य मिडिया युतीतल्या भाजप, शिंदे आणि पवार गटाला इतका विकला गेलेला आहे की अनेक टीव्ही चॅनल्स आणि पत्रकारांनीही युतीची री ओढली आहे. निवडणुकांसाठी बडे राजकीय पक्ष नेहमीच भरमसाठ आश्वासने देत असतात. शेकाप किंवा डावे पक्ष अशांपासून नेहमी दूर असतात. कारण, ते जनतेच्या जवळ असतात. कष्टकऱ्यांसोबत असतात. त्यांच्या खऱ्या गरजा त्यांना ठाऊक असतात. सध्या विधानसभेच्या प्रचारात दोन्ही प्रमुख गटांकडून आश्वासनांचा पाऊस पडतो आहे. आघाडीने सत्तेत आल्यास महिलांना दरमहा तीन हजार रुपये आणि एसटीचा मोफत प्रवास अशी आश्वासने दिली आहेत. या आश्वासनांचा राज्याच्या तिजोरीवर भार पडेल यात शंका नाही. मात्र हीच बाब लाडकी बहीण योजनेबाबतही खरी आहे. या योजनेसाठी ४६ हजार कोटी रुपये लागणार आहेत. त्यांची तरतूद करण्याकरिता समाजकल्याणसह इतर खात्यांचा निधी वळवण्यात आला. आरंभी तर इतक्या खर्चाच्या योजनेला अजितदादांच्या अर्थ खात्याचा विरोधच होता अशा बातम्या होत्या. पण नंतर निवडणुकीतला फायदा लक्षात घेऊन दिल्लीतून दट्ट्या आला. शिवाय खुद्द दादांच्या आणि त्यांच्या पक्षाच्या अस्तित्वाचा प्रश्नही होताच. त्यासाठी मग दादांनी गुलाबी जाकिटे शिवून घेतली आणि माझ्या लाडक्या बहिणींनो करीत ते राज्यभर हिंडू लागले. एकनाथ शिंदे यांना तर पैसे वाटणे म्हणजेच राज्यकारभार करणे असे वाटते. शिवाय, हे पैसे त्यांच्या स्वतःच्या खिशातले नाहीत. त्यामुळे तर वाटायला आणखीनच सोपे. याच रीतीने शिंदे सरकारने साठ वर्षांवरच्या लोकांना तीर्थस्थळांची फुकट यात्रा घडवण्याची योजना आखली आहे. त्यावर शेकडो कोटी रुपये खर्ची पडायचे आहेत. हे सर्व मतांवर डोळा ठेवून केले गेले. पण या योजना जाहीर झाल्या तेव्हा महायुतीने कसा मास्टरस्ट्रोक खेळला अशी चर्चा झाली.

## भाजपाचा खोटारडेपणा

आता महाविकास आघाडीने तोच कित्ता गिरवताच लगेच यांना राज्याच्या तिजोरीचे काय होणार असा प्रश्न पडला. महायुतीचे सरकार गेले अडीच वर्षे सत्तेत आहे. या काळात शिंदे सरकारकडे दाखवण्यासारखी एकही योजना वा कर्तृत्व नाही. त्यामुळे युतीतले तीनही पक्ष आपल्या जाहिरातींमध्ये फक्त आणि फक्त लाडकी बहीण योजनेबाबत बोलत आहेत. प्रचारसभेतल्या भाषणांमध्येही केवळ ही बहीण आणि त्यांना मदत देणारे आम्ही ग्रेट भाऊ असाच सगळा मसाला असतो. शिवाय, विरोधक सत्तेत आले तर ही योजना बंद करतील ही भीती घालणे चालू असते. शिंदे गट आणि भाजपच्या तर जाहिरातींमध्येही हीच भीती घालून प्रचार चालू आहे. वास्तविक ही योजना बंद करणार नाही, उलट तिच्यात अधिक पैसे देणार असे आता महाविकास आघाडी म्हणत आहे. तरीही योजना बंद होईल हे तुणतुणे चालूच आहे. या योजनेमुळे सर्व महाराष्ट्रातील वातावरण बदलून गेले आहे अशी हवा करणे हा यामागचा प्रमुख उद्देश आहे. लोकसभेलाही मोदी की गॅरंटीची अशीच हवा करण्यात आली होती. विरोधक आहेत कुठे असा सवाल मोदी जानेवारीत करीत होते. अबकी बार चारसो पार हीच त्यांची घोषणा होती. जनतेने त्यांना कसा धडा शिकवला हे सर्वांसमोर आहेच. महायुतीही त्याच मार्गाने चालली आहे. गंमत म्हणजे इतके करूनही महायुतीला स्वतःलाच जिंकण्याची खात्री नाही. त्यामुळे काँग्रेसने कर्नाटक आणि तेलंगणामध्ये महिलांना दिलेली आश्वासने पाळलेली नाहीत अशा खोट्या जाहिराती काल भाजपतर्फे सर्वत्र प्रसिध्द करण्यात आल्या. काँग्रेसने त्याविरुध्द निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहेच. पण खरे तर काँग्रेसने न्यायालयातच खटला दाखल करायला हवा. कर्नाटकात किंवा तेलंगणात महिलांना दरमहा पैसे मिळताहेत की नाही हे कोणीही सामान्य माणूस आज मोबाईलवरसुध्दा तपासू शकतो. तरीही भाजप बिनधास्तपणे असा खोटारडेपणा करते हे लक्षात ठेवायला हवे.

## कारस्थानी टोळी

महायुती ही कारस्थानी लोकांची टोळी आहे. यांनी दगाबाजी करून महाविकास आघाडीचे सरकार पाडले आणि आता ते जनतेची फसवणूक करीत आहेत. एकीकडे महाविकास आघाडी आपल्या आश्वासनांसाठी पैसे कोठून आणणार आहे असा सवाल करायचा आणि दुसरीकडे आपण स्वतः सत्तेत असून निव्वळ पैसे वाटण्याच्या योजनांची दशसूत्री जाहीर करायची असा हा दुतोंडीपणा आहे. शिंदे सरकारला महाराष्ट्राच्या विकासाचा आराखडा मांडण्याची किंवा शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी योजना सादर करण्याची गरज वाटत नाही. नवीन नोकऱ्या कुठून निर्माण होणार हे युतीवाले सांगत नाहीत. दोन दिवसांपूर्वी राज्य सरकारच्या आरोग्य खात्याचा पंचनामा करणारा एक अहवाल प्रसिध्द झाला. त्यानुसार राज्य सरकार दरवर्षी केवळ ४.८ टक्के इतकाच खर्च आरोग्यावर करते. महाराष्ट्राचा क्रमांक याबाबत देशात शेवटून दुसरा आहे. गेल्या आठ महिन्यात सरकारी औषधांच्या खरेदीसाठी केवळ आठ कोटी रुपये सरकारने खर्च केले आहेत. तेरा कोटी लोकसंख्येच्या महाराष्ट्रातील समजा चार कोटी लोक सरकारी दवाखान्यांवर अवलंबून आहेत असे गृहित धरले तर त्यांच्यासाठी केवळ आठ कोटींची औषधे सरकारने घेतली आहेत. म्हणजेच बाकीचा खर्च जनतेने आपल्या खिशातून करायचा आहे. महिलांना दर महिन्याला १५०० रुपये दिले म्हणून दोनशे कोटींच्या जाहिराती देणाऱ्या सरकारकडे औषधे घ्यायला मात्र पैसे नाहीत हे आकडे बोलके आहेत. गेल्याच आठवड्यात आणखी एक बातमी प्रसिध्द झाली होती. राज्यातील ग्रामीण आरोग्य केंद्राशी संलग्न असलेल्या खासगी कंत्राटी रुग्णवाहिकांचे गेल्या सुमारे वर्षभराचे पैसे सरकारने थकवलेले आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी या रुग्णवाहिका बंद स्थितीत पडून आहेत. ही सर्व दिवाळखोरीची लक्षणे आहेत. आज महिलांना पैसे मिळाल्याने जनतेतील एका गटाला आनंद वाटत असला तरी अंतिमतः त्यांनाच याचा फटका बसणार आहे. महाविकास आघाडीच्या आश्वासनांनंतर तिजोरीची चिंता करणाऱ्या या लबाड महायुतीनेच राज्याला खड्ड्यात घातले आहे.

---

विचार

# नोकरदारांची खुशी आणि गम!

***सरत्या काळात नोकरदार वर्गाशी संबंधित लक्षवेधी बातम्या समोर आल्या. सर्वप्रथम एसयूव्ही गाड्यांची मागणी वाढून स्वस्त, छोट्या कार्सची मागणी कमी झाल्याची बातमी भुवया उंचावून गेली. त्याच सुमारास नोकरदार वर्ग कर्जाच्या खाईत बुडाले असल्याची आकडेवारी समोर आली. दरम्यान, काही नोकरदारांना बोनस म्हणून चक्क कार भेट मिळाल्याचे समोर आले. या वळणावर 'एआय' सामान्यजनांच्या नोकऱ्या खात असल्याचे समोर आले.***

**महेश देशपांडे**

दिवाळी संपल्यानंतर आता नोकरदार वर्गाशी संबंधित, त्याच्या जिव्हाळ्याच्या अनेक बातम्या समोर येत आहेत. सर्वप्रथम एसयूव्ही गाड्यांची मागणी वाढून स्वस्त, छोट्या कार्सची मागणी कमी झाल्याची बातमी भुवया उंचावून गेली. त्याच सुमारास नोकरदार वर्ग कर्जाच्या खाईत बुडाले असल्याची वेगळी आकडेवारी समोर आली. दरम्यान, काही नोकरदार भलतेच नशिबवान ठरले, कारण त्यांना बोनस म्हणून मालकमंडळींनी चक्क कार भेट दिल्याची माहिती समोर आली. या वळणावर 'एआय' तंत्रज्ञान सामान्यजनांच्या नोकऱ्या खात असल्याचे तथ्य समोर आले.

यंदा सणासुदीच्या काळात एसयूव्हीच्या विक्रीत वाढ होऊन छोट्या कार्सची मागणी घटली. भारतातील काही प्रमुख कार निर्मात्यांनी ऑक्टोबरच्या सणासुदीच्या महिन्यात स्पोर्टस युटिलिटी वाहनांच्या विक्रीत वाढ नोंदवली आहे. यानुसार, ग्राहकांची पसंती मोठ्या आणि प्रीमियम कार्सकडे वळली आहे, तर छोट्या कारच्या बाजारात मंदी आहे. भारतातील सर्वात मोठी कार निर्माता कंपनी असलेल्या मारुती सुझुकीने एसयूव्हीच्या विक्रीत १९.४ टक्के वाढ नोंदवली आहे. हा विक्रमी उच्चांक आहे. त्याच वेळी, क्रमांक दोनची एसयूव्ही उत्पादक 'महिंद्रा अँड महिंद्रा'ने या आर्थिक वर्षात सर्वाधिक मासिक विक्री केली आहे. त्यात २५ टक्के वाढ झाली आहे. 'थार रॉक्स'सारखी नवीन मॉडेल्स बाजारात आणल्यामुळे 'महिंद्रा'ने हे यश मिळवले आहे. 'ह्युंदाई मोटार इंडिया'ने देखील या महिन्यात ३७,९०२ 'एसयूव्ही'ची विक्री केली. ती आतापर्यंतची सर्वाधिक मासिक विक्री आहे. तथापि, गेल्या दोन वर्षांमधील जलद विक्रीवाढीनंतर नवीन कार्सची मागणी मंदावली आहे. त्यामुळे डीलर्सना विक्री कमी करण्यास भाग पाडले आहे. न विकलेल्या गाड्यांच्या वाढत्या संख्येमुळे शोरूम मालक चिंतेत आहेत. ऑक्टोबरच्या सुरुवातीपासून सुरू होणारा सणाचा हंगाम, डीलर्सना त्यांचा साठा साफ करण्यास मदत करत आहे.

अलीकडेच मारुती सुझुकीने सांगितले की सणासुदीच्या हंगामामुळे त्यांची एकूण विक्री ऑक्टोबरमध्ये दोन लाख ०६,४३४ युनिट्सपर्यंत वाढली, निर्यातीत वाढ आणि टोयोटासोबतचे सहकार्य हे त्यामागील महत्त्वाचे घटक आहेत. मात्र छोट्या कार्सना मागणी नसल्यामुळे अनेक उत्पादकांच्या एकूण देशांतर्गत विक्रीवर परिणाम झाला आहे. मारुती सुझुकीच्या छोट्या कार्सच्या विक्रीमध्ये वीस टक्के घट झाली. 'ह्युंदाई मोटार इंडिया'ने माफक ०.८ टक्के वाढ केली. टाटा मोटर्सच्या 'एसयूव्ही'ची विक्री स्थिर राहिली.

दरम्यान, भारतातील नोकरदारांसंदर्भात एक धक्कादायक अहवाल समोर आला आहे. यामध्ये भारतीय नोकरदार वर्ग पूर्वीपेक्षा जास्त कर्जात बुडल्याचे चित्र आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये कर्ज घेणाऱ्यांची संख्या आणखी वाढली आहे. बहुतेक नोकरदार लोकांवर २५ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत हा आकडाही वाढला आहे. मेट्रो शहरांमध्ये कर्ज नसलेल्या लोकांची संख्या खूपच कमी राहिली आहे. नोकरदार महिलांचे बहुतांश कर्ज हे गृहकर्जामुळे असल्याचे अहवालात सांगण्यात आले आहे. सर्वेक्षणानुसार केवळ १३.४ टक्के कामगार कर्जाशिवाय जगत आहेत. २०२२ मध्ये हा आकडा १९ टक्के होता. गेल्या दोन वर्षांमध्ये अनेक नोकरदारांनी कोणत्या ना कोणत्या प्रकारची कर्जे घेतल्याचे सर्वेक्षणातून समोर आले आहे. नोकरदार लोकांनी जास्तीत जास्त २५ लाख रुपयांपर्यंत कर्ज घेतले आहे. असे कर्ज घेणाऱ्यांची संख्या आता ९१.२ टक्क्यांवर पोहोचली आहे. गेल्या वर्षीपर्यंत हा आकडा ८८ टक्के होता. या सर्वेक्षणात २२ ते ४५ वर्षे वयोगटातील १५२९ लोकांना प्रश्न विचारण्यात आले. या सर्वेक्षणात सहा मेट्रो आणि १८ टू टियर शहरांमधील लोकांचा समावेश करण्यात आला होता. यापैकी ४० टक्के महिला होत्या. या सर्वांचा किमान पगार ३० हजार रुपये होता.

सर्वेक्षणानुसार, कर्जदार लोक क्रेडिट कार्डसारखी आर्थिक उत्पादने वापरतात. त्यांना डिजिटल व्यवहारांचे चांगले ज्ञान असते. ते ऑनलाइन शॉपिंगही करतात. सर्वेक्षणानुसार, सध्या कार्यरत असलेल्या २२ ते २७ वर्षे वयोगटातील तरुणांना तंत्रज्ञानाचे चांगले ज्ञान आहे. त्यांना नवीन आर्थिक साधनांबद्दलही जाणून घ्यायचे आहे. यानंतर २८ ते ३४ वयोगटातील लोक येतात. त्यांनी काही वर्षे काम केलेले असते. घर आणि कार खरेदी करण्यासोबतच ते आंतरराष्ट्रीय प्रवासही करत आहेत. तिसरा गट ३५ ते ४५ वर्षांचा आहे, जो आर्थिकदृष्ट्या अधिक मजबूत आहे. सर्वेक्षणानुसार, भारतीय कर्मचाऱ्यांमध्ये घरखरेदीला प्रथम क्रमांकाचे प्राधान्य आहे. यानंतर आरोग्य, नातेसंबंध, प्रसिद्धी आणि प्रगतीवर पैसे खर्च करायचे आहेत. नोकरी करणारे लोक प्रवास आणि निवृत्तीचा इतक्या लवकर विचार करत नाहीत. स्वतःचा रोजगार करण्याची इच्छा तरुणांमध्येही वाढली आहे. त्यांना स्वतःचा स्टार्ट अप सुरू करायचा आहे. या बाबतीत महिला पुढे आहेत. पूर्व भारतात काम करणाऱ्या लोकांना शैक्षणिक कर्ज, दक्षिण भारतात कार कर्ज आणि उत्तर आणि पश्चिम भारतात गृह कर्ज अधिक प्राधान्याने घ्यायचे असते, असे पहायला मिळते.

आता एक खासमखास बातमी. दिवाळीच्या दिवशी कंपन्या कर्मचाऱ्यांना मिठाई, चॉकलेट्स आणि ड्रायफ्रूट्स देतात; परंतु अशा अनेक कंपन्या आहेत, ज्या आर्थिक कामगिरीच्या आधारे दिवाळीला कर्मचाऱ्यांना बोनस म्हणून पैसेही देतात. पंचकुलातील एका फार्मा कंपनीने आपल्या सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी दिवाळी बोनस म्हणून कार भेट दिल्या आहेत. पंचकुला कंपनीने १५ कारचे वाटप केले. 'एमआयटीएस हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड'चे मालक एम. के. भाटिया यांनी आपल्या दोन कर्मचाऱ्यांना ग्रँड विटारा कार भेट दिली आहे तर अन्य १३ कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून टाटा पंच कार देण्यात आल्या आहेत. भाटिया यांनी सांगितले की जीवनातील वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सांभाळण्याचा संघर्ष मला पूर्णपणे समजतो. त्यात कार खरेदी करणे ही लोकांसाठी शेवटची प्राथमिकता असते. मीही अशाच कुटुंबातून आलो आहे, त्यामुळे मला या गोष्टींची जाणीव आहे. कर्मचारी त्यांच्या इतर गरजा पूर्ण करण्यासाठी बचत करतात. अशा परिस्थितीत माझ्या सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सरप्राईज गिफ्ट म्हणून गाडी द्यावी, असे मला वाटले. चेन्नईची एक कंपनीही दिवाळी बोनसनिमित्त चर्चेत आहे. 'स्ट्रक्चरल स्टील डिझाईन अँड डिटेलिंग कंपनी'ने आपल्या कर्मचाऱ्यांना मनोबल आणि उत्पादकता वाढवण्यासाठी दिवाळीनिमित्त २८ कार आणि २९ बाइक भेट दिल्या आहेत. कंपनीमध्ये १८० अत्यंत कुशल लोक आहेत, ज्यापैकी बरेच लोक अतिशय गरीब पार्श्वभूमीतून आले आहेत.

आता एक वार्ता नोकरदार वर्गाचा ताण वाढवणारी. २०२३ पासून जगभरात टाळेबंदी सुरू असली तरी कोणतीही कंपनी यासाठी 'एआय' जबाबदार आहे हे मान्य करायला तयार नाही; मात्र आता 'एआय'च्या धोक्याबाबत सरकार सतर्क झाले आहे. 'एआय'मुळे नोकऱ्या जात असल्याचा दावा अर्थ मंत्रालयाने केला आहे. त्याच्या परिणामाबाबत अर्थ मंत्रालय सावध झाले आहे. तसेच, भविष्यात 'एआय'वर बारीक लक्ष ठेवण्याची तयारी केली जात आहे. यापूर्वी, आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या आर्थिक सर्वेक्षणात 'एआय'मुळे अनेक लोकांच्या नोकऱ्या गमावण्याचा इशारा देण्यात आला होता. आता सप्टेंबरच्या मंथली इकॉनॉमिक रिव्ह्यूमध्ये 'एआय'मुळे नोकऱ्यांना धोका आहे, असे म्हटले आहे. या विषयावर बारकाईने लक्ष ठेवण्याची गरज आहे. आज 'एआय' कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांची जागा घेत आहे. आर्थिक पुनरावलोकनानुसार श्रमिक बाजार सध्या स्थिर आहे.

बेरोजगारीचा दरही ३.२ टक्क्यांवर थांबला आहे. देशाच्या कार्यशक्तीमध्ये महिलांचा सहभाग वाढला आहे. अहवालात म्हटले आहे की 'ईपीएफओ'चा डेटादेखील नोकऱ्या वाढण्याचे संकेत देत आहे. सरकारी आणि खासगी क्षेत्राला एकत्र काम करावे लागेल; मात्र अनेक कंपन्यांमध्ये 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' वेगाने आपले स्थान निर्माण करत असल्याचे अनेक अहवाल समोर आले आहेत. या ट्रेंडवर आपण बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे. जुलैच्या आर्थिक सर्वेक्षणात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आगमनामुळे कमी कौशल्य, अर्ध कुशल आणि उच्च कुशल कामगारांवर परिणाम होईल, असे म्हटले होते. 'एआय' सतत नोकऱ्यांसमोर अडथळे निर्माण करेल. याला तोंड देण्यासाठी आगामी काळात केंद्र सरकार, राज्य सरकारे आणि खासगी क्षेत्राला एकत्रितपणे काम करावे लागेल.

---

आजकाल

# बिगर-श्रमाच्या योजना आणि विकृत विकास

**सोमिनाथ घोळवे**

शेतकरी सन्मान निधी, नमो किसान योजना, लाडकी बहिण, श्रावण बाळ योजना, वयस्कर नागरिकांना मोफत बस प्रवास अशा विविध बिना श्रमाच्या लाभार्थी योजनां सरकारने पुढे केल्या. या योजनांनी सामान्य, कष्टकरी, हातावर पोट असलेल्या नागरिकांच्या जगण्याचे प्रश्न खूपच गंभीर बनवले आहेत. एकंदर तळागाळातील नागरिकांचे जगण्यासाठी शाश्वत आर्थिक स्त्रोत निर्माण करून देण्यास शासन असफल ठरत आहे. त्यामुळे अशा योजना पुढे केल्या आहेत. दुसरीकडे अशा बिगर श्रमाच्या योजना पुढे करून सामान्य नागरिकांच्या बाबतीत जे उत्तरदायित्व होते, त्यातून बऱ्याच अंशी आंग काढून घेणे चालू आहे. एकप्रकारे जबाबदारी झटकने चालू आहे. निवडणुकीच्या निमित्ताने या संदर्भात सामान्य नागरिकांकडून चिंतन होणे गरजेचे आहे.

एक निरीक्षण :


शेतकऱ्यांना शेतीतील गुंतवणूक करणारी साधने (input) रांगेत (लाईनमध्ये) उभा रहावं लागतं. उदा. पीक कर्ज, बँकेतून पैसे काढणे किंवा इतर.

तसेच शेतमाल विकायचा असेल तरीही रांगेत (लाईनमध्ये) उभे राहावे लागते.

असे का???

अर्थात घेणं असेल (इनपुट किंवा) देणं या दोन्हीसाठी त्रास सहन करावा लागतो. हा गेल्या १० वर्षांपासूनचा हा अनुभव आहे.

टीप: मी शासनाच्या संदर्भातील अनुभवाविषयी बोलत आहे. पर्यायाने शेतकऱ्यांना शेतीतील इनपुट खरेदी खासगी व्यापारी, दलाल, मध्यस्थी यांच्याकडून खरेदी करायला लावले जातात. तसेच शेतमाल देखील मध्यस्थी, दलाल, व्यापारी यांना विकायला



लावला जातो.

गावांच्या शिवारात फिरताना सहज दिसून येणारी बाब म्हणजे जमिनीला पाण्याचा असलेला शोक. माळरानच्या जमिनीचा ओलावा संपत चालला आहे. जमिनी पाणी मागत आहेत. पण पाणी देणार कसं?. पाणी भूगर्भात ( विहिरींना, बोअरवेल) किंवा भूपृष्ठावर (तलाव, नद्या, पाझर तलाव, शेततळे) हवं. पाणी आताच हळूहळू कमी होऊ लागले आहे. विहिरी चार दिवसांमध्ये सांगळयावर येतील अशी स्थिती आहे.

यंदा पाऊस चांगला झाला असा भ्रम आहे. पाऊस जेमतेम झाला आहे. अनेक भागात पाऊस सरासरीपेक्षा कमी झालेला आहे. एकूणच जलसंधारणाची कामे झाली नसल्याने उथळ जमिनीवर पाणी साचून राहिल्याने पाऊस जास्त झाला असल्याचा भास होत आहे.

दुष्काळी आणि कोरडवाहू परिसरात फिरताना गाळाने भरलेली धरणे, तलाव, पाझर तलाव दिसतात. त्यात पाणीसाठ्याचे अंदाज गाळासह असणे, उघड्या पाण्याचे होणारे बाष्पीभवन, प्रत्यक्ष पाणीसाठ्याचा अंदाज न येणे. भूगर्भातील पाणी साठे किती आणि कसे आहेत हे न समजणे, भूगर्भातून पाणी उपसा वर नियंत्रण नसणे, निर्मित सिंचन क्षेत्राच्या घसरण होणे, पाणी नियोजन, पाणी व्यवस्थापन सक्षम नसणे, पाणी वाटपाचे काहीच नसणे असे कितीतरी उणीवा आहेत. त्यामुळे वास्तव पाण्याचा अंदाज येत नाही.

एकीकडे प्रशासनाची पाण्याच्या बाबतीत मनमानी चालू आहे. लहरीपणा तर नसानसात भरलेला आहे. दुसरीकडे याचा परिणाम सामान्य जनतेला, शेतकरी वर्गाला भोगावा लागतोय. परिणामी पाऊस जेमतेम होऊनही डिसेंबर पासून पाणीटंचाई ही दिवसेंदिवस चालूच रहाते. एकूणच पाणी प्रश्न हा राजकीय कार्यक्रम बनायला हवा. पण जाणीवपूर्वक बनू दिला जात नाही. जोपर्यंत पाण्याच्या बाबतीत अनागोंदी राहील तोपर्यंत पाणी ही धनधांडग्यांची मालमत्ता राहणार आहे. शेताच्या वरून ही ४ हजार व्हल्टेजची वीज गेली आहे. एका पोलसाठी दोन चुलत्यांची तीन गुंठे जमीन घेतली आहे. जमिनीच्या बदल्यात मोबदला मिळाला आहे. पण अशा सुपीक जमिनीवरून वीज घेऊन जाण्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात जमीन बिगर शेती होत आहे. या संदर्भात काही नियोजन नाही, शेतकऱ्यांना विचारणा नाही. कधीही उठायचे आणि रस्ते, वीज किंवा इतर कोणतातरी प्रकल्प उभा करायचा. त्यास ''विकास'' नाव द्यायचे आणि जमिनीचा विध्वंस करायचा. असा पराक्रम गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. अशा ''विकृत विकासा''च्या माध्यमातून शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर - हातावर पोट भरणारे यांना शहरात पळवणे, हाकलणे चालू आहे. एकंदर विकासाच्या नावाने शेतीवर (कृषी) आणि पर्यावरणावर खूप मोठे आक्रमण करणे चालू आहे. हे जर थांबले नाही तर याची किंमत लवकरच मोजावी लागणार आहे.

**साभार**

---

लोकसंसद

## महिलांबाबत अमेरिका आजही संकुचित

डोनाल्ड ट्रम्प हे कमला हॅरिस यांचा पराभव करून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनले. डोनाल्ड ट्रम्प यांचा विजयास आणि कमला हॅरिस यांच्या पराभवास डोनाल्ड ट्रम्प यांचा आक्रमक प्रचार आणि ज्यो बायडेन यांचा चार वर्षाचा निष्क्रिय कारभार जबाबदार आहे. ज्यो बायडेन यांची अमेरिकेच्या इतिहासात सर्वात निष्क्रिय राष्ट्राध्यक्ष



अशी नोंद झाल्यास आश्चर्य वाटायला नको. कमला हॅरिस यांच्या पराभवास ज्यो बायडेन यांची निष्क्रियता जितकी जबाबदार आहे तितकीच किंबहुना त्याहून अधिक अमेरिकन नागरिकांची मानसिकताही जबाबदार आहे. आज २१ व्या शतकातही अमेरिकन नागरिक एका कृष्णवर्णीय महिलेला आपला नेता मानायला तयार नाहीत हेच यातून सिद्ध होते. जगातील सर्वात जुनी लोकशाही असलेल्या अमेरिकेत आजवर एकही महिला राष्ट्राध्यक्ष होऊ शकली नाही हे आश्चर्यच आहे. जागतिक महासत्ता असलेल्या देशासाठी खरेतर ही नामुष्कीची बाब आहे. अमेरिका कितीही पुढारली असली, जागतिक महासत्ता बनली असली तरी महिलांबाबत अमेरिकन नागरिकांची मानसिकता संकुचितच आहे हे यानिमित्ताने पुन्हा एकदा सिद्ध झाले.

**- श्याम ठाणेदार**, पुणे

---

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**७ नोव्हेंबर**

**१८६५:-** अमेरिकन मिशनरी हेनरी व्हॅलटाईन यांचा जन्म. मिशनच्या निमित्ताने नगरला स्थायिक. तेथेच मराठी व संस्कृतवर प्रभुत्व मिळवले. मराठी ख्रिस्ती साहित्यक्षेत्रात त्यांची एक वैशिष्ट्येपूर्ण कामगिरी म्हणजे ख्रिस्ती मंदिरातून मराठी संगीताची हकालपट्टी करुन त्याऐवजी इंग्रजी गीतांची मराठी भाषांतरे केली. ती भाषांतरे देवाचे भजन करण्याची गीते' या नावाने प्रसिध्द. 'लेकरांची गायन' हा त्यांचा आणखी एक काव्यसंग्रह. मराठीतून 'जगन्नाथाविषयी' एक छोटी पुस्तिका लिहिली. पहिले मराठी ख्रिस्ती नियतकालिक 'ज्ञानोदय' याचे ते संस्थापक संपादक. **१८८०:-** स्त्री नाटककार सोनाबाई चिमाजी केरकर यांचा जन्म. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. तत्पूर्वी 'संगीत संभाजी' हे नाटक त्यांनी लिहिले. तथापि हे नाटक आ. मो. पाठारे यांचे 'संगीत संभाजी' हे नाटक समोर ठेवून सोनाबाईंनी रचले असावे अशी शंका येते. कारण नाव, कथानक यात बराचसा सारखेपणा आहे परंतु असे असले तरी त्या काळात प्रकाशित झालेल्या स्त्रीनाटककाराचे हे पहिलेच नाटक असल्याने त्याचे मोल अनमोल आहे. **१९०७ :-** कोकणच्या इतिहासाची साधने मोठ्या प्रमाणावर उजेडात आणणारे इतिहास संशोधक शांताराम आवळसरकर यांचा जन्म. आंग्रेकालीन अष्टागर', 'नागाव : आर्थिक व सामाजिक जीवन', 'कोकणातील ऐतिहासिक (दंत) कथा व ऐतिहासिक कथा (दोन खंडांत)' अशा पुस्तकांखेरीज 'चंद्रप्रकाश' (कवितासंग्रह) व 'रायआवळे' (ललित लेखसंग्रह) ही पुस्तकोही त्याचीच. **१९२६ :-** लेवा पाटील समाजाचे इतिहासकार अशी ओळख असणारे लेखक शंकर विठोबा पाटील यांचा जन्म. यांची साहित्य निर्मितीत 'तीर्थरुप भारत दर्शन', 'वारकरी पंथाची चैतन्य संप्रदाय परंपरा', 'वारकरी पंथाचा इतिहास', 'लेवा पाटीदारांचा इतिहास', 'शांडिल्य गोत्र ग्रंथ', 'काव्य गुच्छ', 'इतिहासकार व थोर समाज सेवक', 'नळगंगा तीरीचे सारस्वत', 'भोरगाव लेवा पंचायत स्मरणिका', 'गणगात', 'डॉ. वि. भि. कोलते चरित्र' इत्यादी. **१९२८ :-** पाठ्यपुस्तक लेखक डॉ. अनंत वामन ओक यांचा जन्म. शैक्षणिक संख्याशास्त्राची मुलतत्त्वे हे पाठ्यपुस्तक त्यांच्या नावावर आहेत. **१९४५ :-** लेखिका शबनम नीर पूर्वाश्रमीच्या निर्मला शंकरराव चांदेकर यांचा जन्म. 'नायक', 'कस्तुरीगंध' मिळून ५ कादंबऱ्या. 'बंद लिफाफा', 'गुफ्तगु' मिळून ५ कथासंग्रह, 'गुलदस्ता' हा एकांकिका संग्रह अशी साहित्य संपदा. **१९४८ :-** नाट्यलेखक शामराव बाबूराव गोदडे यांचा जन्म. ह्यांनी 'गाव साधं पुढारी सादं', 'सरपंच खूनी पाटील बेइमानी', 'हॅलो मी चेअरमन बोलताय' अशी नाट्य संपदा. **१९४९ :-** लेखक, राज्यशास्त्राचे जाणकार प्रा. दिलीप पांडुरंग धर्म यांचा जन्म. 'आधुनिक राजकीय विश्लेषण' 'संशोधन : स्वरुप आणि पध्दती' आदी ग्रंथ प्रसिध्द. **१९६२ :-** स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते, समाज सुधारक व लेख महर्षी धोंडो केशव कर्वे उर्फ अण्णासाहेब यांचे निधन. **१९६७ :-** कवी, भाषांतरकार सीताराम वासुदेव पेंडसे यांचे निधन. 'पद्यकुसुमांजली' या काव्यसंग्रहासह 'महाराजा शिवाजी' हे चरित्र आणि डॉ. मॅक्डोनेल यांच्या 'हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर' या ग्रंथाचे भाषांतर ही त्यांची महत्त्वपूर्ण कामगिरी. **१९७३ :-** निवेदक आणि विविध विषयांवर लेखन, व्याख्याने देणाऱ्या लेखिका धनश्री लेले यांचा जन्म संस्कृत आणि जर्मनी भाषेवर त्यांचे प्रभुत्व आहे. 'आमची भाषा' या छोटेखानी पुस्तकासह 'वेष अज्ञाचा' हे हस्तसामुद्रिक विषयावरील पुस्तक प्रसिध्द तसेच मेघदुतावर लेखन सुरु आहे. याशिवाय दै. सकाळ मधील 'गुड मॉर्निंग' या सदरातील लेखांवर पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर आहे. **१९७७ :-** पत्रकार आणि 'जागृत' साप्ताहिकाचे संपादकपद भुषवलेले भगवंत बळवंत पालेकर यांचे निधन. **१९७७ :-** संगीतकार व संगीत-समीक्षक केशवराव भोळे यांचे निधन. अभिजात कंठ्यसंगीताविषयीचे 'आजचे प्रसिध्द गायक (१९३३) हे त्यांचे पहिले पुस्तक म्हणजे टोपणनावाने 'वसुंधरा' या साप्ताहिकात लिहिलेल्या लेखांचा संग्रह होता. त्यात काही लेखांची भर घालून संगीताचे मानकरी' ही आवृत्ती आली. 'आवाजाची दुनिया', 'अस्ताई', 'वसंतकाकांची पत्रे', 'अंतरा', 'माझे संगीत आणि जे आठवते ते ही त्यांची अन्य पुस्तके.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# हवा प्रदूषणात उरण देशात तिसऱ्या क्रमांकावर

## ■ नागरिकांना सर्दी-खोकला अन् श्वसनाचा त्रास

**। उरण । वार्ताहर ।**

**गेल्या काही दिवसांपासून उरणच्या हवेची गुणवत्ता खालावू लागली असून गुरुवारी दुपारी हवा गुणवत्ता निर्देशांक ३०० पार गेल्याने प्रदूषणात उरण शहर देशात तिसऱ्या क्रमांकाचे शहर गणले गेले. परंतु, धूलिकणवाढ मानवी शरीरास घातक नसल्याचा दावा विभागीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने केला आहे.**

उरणच्या हवेचा निर्देशांक ३१८ वर पोहोचला होता. गेल्या अनेक वर्षांपासून उरणच्या प्रदूषित हवेच्या मात्रेत सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे नागरिकांना सर्दी-खोकला आणि श्वसनाचाही त्रास होऊ लागला आहे. सध्या आर्द्रता वाढत असल्याने सकाळी प्रदूषके साचून राहतात.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषांनुसार, हवा गुणवत्ता निर्देशांकातील ०-५० म्हणजे चांगले, ५१-१०० समाधानकारक, १०१-२०० मध्यम, २०१-३०० वाईट, ३०१-४०० अत्यंत वाईट आणि ४०० पेक्षा जास्त म्हणजे अतिधोकादायक समजली जाते.

उरण परिसरात सध्या सकाळी धुके पडत आहे. कमाल तापमान ३३ ते ३५ अंश सेल्सिअसच्या आसपास राहत आहे, तर किमान तापमान २० ते २७ अंश सेल्सिअसच्या आसपास आहे.

पावसाळ्यानंतर वाऱ्यांची स्थिती बदलते, वेग मंदावतो. त्यामुळे हवेत साचलेली धूळ, प्रदूषके यांचा निचरा होत नाही. बाष्पामुळे धूलिकण हवेतच तरंगत राहतात. या नैसर्गिक कारणांबरोबरच अनेक मानवनिर्मित कारणेही प्रदूषणात भर घालत आहेत.

पावसाळ्यात येथील राष्ट्रीय महामार्गावर आलेल्या मातीची धूळ झाली आहे. या मार्गावरून दररोज हजारो जड वाहने ये-जा करीत असल्याने त्याचप्रमाणे शेतीच्या मळणीला सुरुवात झाल्याने उरण परिसरात धूलिकणांत वाढ झाली असल्याने हवा गुणवत्ता खालावली आहे. मात्र ही हवा हानीकारक नाही. उरणमध्ये हवा गुणवत्ता मोजण्यासाठी व्यवस्था आहे , असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे विभागीय अधिकारी, विक्रांत भालेराव यांनी सांगितले.

### आजारांबाबत काळजी काय घ्यावी?

**प्रदूषणामुळे श्वसन आणि त्वचेशी संबंधित आजार उद्भवतात. सकाळी आणि सायंकाळी धुरक्याचे प्रमाण जास्त असते. अशा वेळी घराबाहेर पडणे टाळावे. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे. थंड पेये, तेलकट पदार्थ वर्ज्य करावेत. लहान मुले, वयोवृद्ध यांच्यासाठी हे वातावरण धोकादायक असल्याने त्यांनी विशेष काळजी घ्यावी.**

### धुळीमुळे हवा खराब

**उरण तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गांवरील अवजड वाहनांची वाढती संख्या तसेच व्यावसायिक संकुले, नवे प्रकल्प यांची बांधकामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. त्यातून उडणारी धूळ हवेचा दर्जा ढासळण्यास कारणीभूत ठरत असल्याचे निरीक्षण तज्ज्ञांकडून नोंदवण्यात येत आहे. वाहनांच्या धुरामध्ये अतिसूक्ष्म काजळीसारखे कण असतात. हे कण प्रदूषण वाढविण्यास कारणीभूत ठरतात.**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**९ नोव्हेंबर**

१) श्री. नारायण गणपत पवार चेंढरे, अलिबाग, ९-११-१९३५
२)श्री.सुभाष पुरूषोत्तम क्षीरे चेंढरे,अलिबाग, ९-११-१९४०
३)श्री.अशोक वसंत म्हात्रे चेंढरे, अलिबाग ९-११-१९४४
४)श्री.सुमत अनंत म्हात्रे मु.थळ-आगार, ९-११-१९४२
५)श्री.लायकअल्ली अब्दुल अनवारे अलिबाग, ९-११-१९५३

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे अंभेरपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्यामिळकतीचे मालक जॉन ब्रायन डिसिल्वा व मॅरीईन सुरेसा डिसिल्वा यांचे कडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ७६ | २ | २-९९-५० पैकी विकत देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०-३०-०० | ०-५६ |

सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर, पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/११/२०२४

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशील १) श्री. प्रदिप उत्तम वाघमारे, २) श्री. प्रतिक अनंत शिंदे, ३) सौ. सुप्रिया सुनिल नाईक यांनी खाली वर्णन केलेल्या शेतजमिनीचे मालक श्री. विवेकानंद वसंतराव कापडणेकर उर्फ पाटील यांच्याकडून विकत घेण्यासाठी साठेकरार केलेला आहे. सदर मिळकत मौजे तळवडे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे आहे.

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| तळवडे | १३५ | ०-७३-५० पैकी ०-२२-०० | १-६२ ०-४८ भोगवटादार वर्ग -१. खाते क्र.२८७ |

सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही, कसल्याही प्रकारचे करारपत्र वगैरे दस्तांच्या आधारे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आंत कागदोपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत खाली सही करणार यांच्याकडे दाखल करावी. उक्त मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास आमचे अशील सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून सदर मिळकत खरेदी करतील व मागाहून कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत आमच्या अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०८-११-२०२४.

सही/-
**(ॲड. विकास हरिश्चंद्र पाटील )**
''युगंधर सोसा. शॉप नं.०६,
युनियन बँकेशेजारी, ब्राम्हण आळी,
अलिबाग, जिल्हा-रायगड.
मो- ७७९८८४४४३३.

## ‘कवितेच्या सुरातून’ पुस्तकास पुरस्कार



**अलिबाग :** कोकण मराठी साहित्य परिषदेचा संकीर्ण विभागातील प्रथम पुरस्कार रमेश प्रभाकर धनावडे यांच्या 'कवितेच्या सुरातून' या पुस्तकास जाहीर झाला आहे.पुढील आठवड्यात एका शानदार कार्यक्रमामध्ये मालगुंड, रत्नागिरी येथे हा पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे. रायगड भूषण पुरस्कारापासून अनेक पुरस्कार रमेश धनावडे यांना मिळाले आहेत. कोकण मराठी साहित्य परिषदेचा हा मिळालेला पुरस्कार निश्चितच माझ्यासाठी दिलासादायक, आनंददायक व भविष्यासाठी दिशादर्शक आहे, असं रमेश धनावडे यांनी सांगितले. कवितेच्या सुरातून या पुस्तकामध्ये साडेआठशे वर्षापूर्वीचे संत ते कवींची अशी एकूण ६३ प्रथितयश साहित्यिक कवींची यशोगाथा त्यांनी अधोरेखित केली आहे.

**This may be published in Newspapers and TV from the day following the last date for withdrawal of candidature and upto two days before the date of poll**

Format C-1
(for candidate to publish in Newspapers, TV)

**Declaration about criminal cases**
(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)
Name and address of candidate: Mahendra Sadashiv Thorve, At. Posari, Post. Tiware, Tal. Karjat, Dist.Raigad.
Name of political party : Shiv Sena
(Independent candidates should write "Independent" here)
Name of Election: Maharashtra Legislative Assembly Election - 2024
*Name of Constituency: 189 - Karjat
I, Mahendra Sadashiv Thorve (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

**(A) Pending criminal cases**

| Sr. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case (s) | Sections (s) of Acts concerned and brief description of offence (s) |
|---|---|---|---|---|
| 1 | Ulhasnagar Chopra Court | 318/2012 | Pending | IPC 420, 423, 464, 465, 466, 467, 468, 469, 471, 34 |
| 2 | High Court, Mumbai | 84/2009 | Pending | IPC 341, 307, 323, 147, 148, 149R/W34 |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sr. No. | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| 1 | Not Applicable | Not Applicable | Not Applicable |

*In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of constituency.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल १. श्री. निलेश तुकाराम म्हसे व २. श्री. संतोष अरविंद शेलार यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तीचे मालक मेसर्स दयार रेअल्टी एल एल पी, भागीदारी संस्था तर्फे भागीदार १. मोहम्मद ताहीर अन्सारी, २. मोहम्मद तारीक अन्सारी, याचेंकडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नंबर | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ. मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ३९३ | ५ | २८२-४० | २८-४० |

तरी वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजामुक्त आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. ०९/११/२०२४.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप न. १२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.-९३२५०६००३७.

दि. ०८/११/२०२४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे कडाव, ता. कर्जत जि. रायगड येथील

| मालकाचे नाव | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| श्री. जयराम पवार | ९२ | ४/ड | ०-०६-०० | ०-१७ |
| श्री. प्रथमेश पवार | ९० | | ०-६५-५० पैकी ०-३०-०० | १-१२ |

च्या शेतजमीन मिळकती विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाच्या ठरविलेल्या आहेत. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडुन आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसबंध असल्यास सदरील नोटीस नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही. व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेले आहेत. असे समजुन कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त शेतजमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा.''मातोश्री निवास आवळस,
ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## जाहीर नोटीस

खालील वर्णन केलेली प्रभाकर पाटील एजुकेशन सोसायटी (र.नं. एफ- ३३७३ (रायगड) या न्यासाची स्थावर मिळकत ‘जशी आहे तशी’ या तत्वावर विक्री करण्याकरिता सीलबंद निविदा जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून २५ दिवसांचे आत मागवण्यात येत आहेत.

मिळकतीचे वर्णन: “(I) स. क्र. 54A/5/A, 10H-09R-0P, (II) स. क्र. 54A/5/B, 0H-26R-0P. (III) स. क्र. 54A/5/C, 0H-53R-0P, (IV) स. क्र. 54A/5/D, 0H-26R-0P, (V) स. क्र. 54A/5/E, 0H- 26R-0P, एकूण ११४० गुंठा जमीन, भिलवले गाव, तालुका- खालापूर, जिल्हा रायगड मध्ये स्थित.”

निविदा धारकांनी आपल्या ‘निविदा अर्ज’ दिनांक ०४/१२/२०२४ तारखेला सका. ११:०० पर्यंत किंवा त्याच्या आत दाखल कराव्यात. निविदा उघडल्यावर जाहीर लिलाव करण्यात येईल. निविदा मध्ये अटी आणि शर्ती असू नयेत, अशा प्रकारच्या निविदा बाद समजण्यात येतील. निविदांसोबत ट्रस्टच्या नावे **(प्रभाकर पाटील एजुकेशन सोसायटी)** रुपये २५,००,०००/- रकमेचा DD/CHQ जोडणे आवश्यक आहे.

सीलबंद निविदा दिनांक ०४/१२/२०२४ रोजी सायं. ०५:०० वाजता खालील पत्त्यावर सर्व निविदा धारकां समोर उघडण्यात येतील. MOU/करारातील अटी आणि शर्तींचे अधिकार विश्वताना राहतील. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्या परवानगीने व्यवहारास अंतिम स्वरूप देण्यात येईल.

केवळ विहित वेळेत प्राप्त झालेल्या निविदांचाच विचार होईल. निविदा स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे संपूर्ण अधिकार विश्वातानाच राहतील. नाकारलेल्या निविदा धारकांना कोणतेही कारण देण्यास विश्वस्त जवाबदार नसतील. इतर माहितीसाठी खालील पत्त्यावर संपर्क करावा आणि ‘निविदा अर्ज’ हा (संस्थेची घटना आणि मालमते संबंधित कागदपत्रांच्या प्रती सोबत) खालील दिलेल्या पत्यावर रु. ५०००/- देऊन घेता येईल (वेळ: सोमवार ते शुक्रवार सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत) (हि रक्कम परत दिली जाणार नाही).

दि. ०९/११/२०२४

विश्वस्त
**‘प्रभाकर पाटील एजुकेशन सोसायटी’**
र.नं. एफ- ३३७३ (रायगड)
अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मी खालील वर्णनाची मिळकत जमीन सदर जमीनीचे मालक यांचेकडून कायम खरेदी खताने खरेदी घेण्याची ठरविलेली आहे. सदरहु जमीन ही सदर जमीनीचे मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटींस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नांवे आहे त्या मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोंदिवडे, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड येथील मिळकत.**

| जमीन मालकाचे नांव | गावाचे नांव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|---|
| १) मणिकुमार आंबाडी | कोंदिवडे | ४ | ४अ | ०-४५-०० | १-४४ |
| २) विनीता मणिकुमार आंबाडी | | ४ | ८ | ०-०५-८० | ०-२७ |
| रा. ब्लॉक नं.१०५/१०६, प्लॉट नं.बी ११५ सेक्टर नं. ८, वाशी नवी मुंबई | | ४ | १क | ०-१०-०० | ०-२८ |

तरी वरील प्रमाणे मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध साठेकरार, ताबा, बयाणा पावती, गहाण, दान, बक्षिस भाडेपट्टा, बोजा, जप्ती कुळवहिवाट, इजमेंट, चार्ज, मृत्युपत्रांकित, दान, लिज, लिएन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असलेस संबधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आंत खालील लिहिलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत कळवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यांत यावी. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यांस वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून त्यासंबधी कोणाचेही हक्क हितसंबध नाहीत असे गृहित धरुन आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन आम्ही सदर मिळकतीचा खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करु मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली.

दिनांक : ०७/११/२०२४

**श्री. बिरेंद्र यादव**
रा-ए-१२०२, श्रीजी हाईटस सेक्टर-४६
ए सीवूड्स नेरूळ नवी मुंबई - ४०००७०६
मोबाईल नंबर - ९३२१५९५४५५

## तळा नगरपंचायत तळा

मु.पो.ता.तळा,जि.रायगड, पिन कोड ४०२१११
फोन नं.०२१४०-२६९०२६ Email id-nagarpanchayattala@gmail.com

जा.क्र./तनपं/ /२०२४-२५ दिनांक : ०८/११/२०२४

**स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत**
**मॅन्युअल स्कॅवेनजिंग, मलनिस्सारण व्यवस्थापन, दंड आकारणी बाबत.**
(Manual scavenging. FSSM & Spot Fines )

या जाहीर सूचनेद्वारे सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, तळा नगरपंचायत द्वारा FSSM (Faecal Sludge Septage Management) सेप्टिक टाकी मैला व्यवस्थापन अंतर्गत शहरातील सर्व सेप्टिक टाकी सफाई केली जाते. तसेच तळा शहराला शासनाकडून हागणदारीमुक्त संकल्पनेत ODF+ दर्जा प्राप्त असून ODF ++ दर्जा मिळवण्याच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. त्या अंतर्गत तळा शहरातील सर्व घर/शाळा/हॉटेल/सरकारी कार्यालय शौचालयातील सेप्टिक टँकमधील मल कोठेही उघड्यावर, नालीत, नदीपात्रात न सोडता न नगरपंचायतीच्या मलनिस्सारण केंद्राकडे प्रक्रिया करण्यासाठी देण्यात यावा, तरी कोठेही उघड्यावर शौचालयात मल आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येईल, याची नागरिकांनी नोंद घ्यावी.

**(दंडाचे जोडपत्र)**

| अनु क्र. | कृती/बाब | दंड रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | रस्ते/मार्गावर घाण करणे | १५०/- |
| २ | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे | १००/- |
| ३ | उघड्यावर लघवी/लघुशंका करणे | १००/- |
| ४ | उघड्यावर शौच करणे | ५००/- |
| ५ | मैल पाणी उघड्यावर/सार्वजनिक ठिकाणी सोडणे | ५००/- |

तसेच तळा नगरपंचायत हद्दीतील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, न.प. हद्दीतील मैला उचलणे/हाताळणे/वाहने यावर पूर्णपणे बंदी असून गेल्या वर्षभरात मॅन्युअल स्कॅवेनजिंग बाबत कोणतेही व्यक्ती / (No Manual Scavening Incident occurs Inpast 1 year in the ULB) तरी कोणत्याही व्यक्ती/संस्था द्वारा असे कृत्य करणे किंवा करण्यास प्रवृत्त करणे याबाबतचा अपराध सिद्ध झाल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन स्वच्छ सर्वेक्षण २०२४ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सहकार्य करावे.

| अनु क्र. | तक्रार निवारणाकरिता प्राधिकृत अधिकारी/कर्मचारी | संपर्क क्र. | आकारणी शुल्क |
|---|---|---|---|
| १ | श्री. दीपक बडके (स्वच्छता निरीक्षक) | ८२३७१०६०८० | रु.१०००/- प्रति फेरी |
| २ | श्री.अखातर बडे (ऑपरेटर) | ९७६४८२७२८ | |

सही/-
**(मनीषा नागसेन वजाळे)**
**मुख्याधिकारी**
**तळा नगरपंचायत तळा**

## तळा नगरपंचायत तळा

मु.पो.ता.तळा,जि.रायगड, पिन कोड ४०२१११
फोन नं.०२१४०-२६९०२६ Email id-nagarpanchayattala@gmail.com

जा.क्र./तनपं/ /२०२४-२५ दिनांक : ०८/११/२०२४

**जाहीर सुचना**
**नगरपंचायत तळाला ODF ++ सिटी घोषित करण्याबाबत**

शहरातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, नगरपंचायत तळा व्दारा ODF ++ घोषित करण्याकरीता शासनाने नेमून दिलेल्या सर्व निकषांची अंमलबाजावणी होत असल्याने नगरपंचायत व्दारे तळा नगरपंचायतीला ODF + चा दर्जा प्राप्त झालेला आहे. तसेच ODF ++ दर्जाचे शहर घोषित करण्यात येत आहे. वरील घोषणा करीता जनतेच्या हरकती व सुचना असल्यास कार्यालय नगरपंचायत तळा येथे (घोषणा प्रकाशित झाल्यापासून) १५ दिवसांच्या आत सादर करावे.

सही/-
**(मनीषा नागसेन वजाळे)**
**मुख्याधिकारी**
**तळा नगरपंचायत तळा**

## तळा नगरपंचायत तळा

मु.पो.ता.तळा,जि.रायगड, पिन कोड ४०२१११
फोन नं.०२१४०-२६९०२६ Email id-nagarpanchayattala@gmail.com

जा.क्र./तनपं/ /२०२४-२५ दिनांक : ०८/११/२०२४

**जाहीर सुचना**
**नवीन सेप्टिक टँक बांधकाम बाबत बांधकाम निर्देशाचे पालन करणे बाबत**
(New Septic Tank Design Criteria & Construction As per - IS:2470 Part I & II)

तळा नगरपंचायत हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांना व संबधीताना सूचित करण्यात येते कि. तळा शहरात नव्याने बांधकाम सुरु असलेले घरकुल, दुकाने व इतर बांधकाम संरचनेत वैयक्तिक/व्यावसायीक किंवा सार्वजनिक शोचालायचे सुरु असलेले किंवा नव्याने बांधकाम करावयाचे असल्यास त्या करीता सेप्टिक टँक बांधकामाची संरचना (Septic Tanks Design Criteria & Construction) शासनाने निर्देशित केल्या प्रमाणे बांधकाम मंजुरी नुसार (IS: 2470 Part I & II Design) प्रमाणे बांधकाम करणे बंधनकारक करण्यात येत आहे. इंडियन स्टँडर्ड कोड ऑफ प्रॅक्टिस फॉर इंस्टॅलेशन ऑफ सेप्टिक टॅन्कची प्रत नगरपंचायत तळा कार्यालयात उपलब्ध आहेत. व IS: 2470 Design विषयी तांत्रिक सहाय्य व इतर आवश्यक माहिती करीता खालील क्रमांकावर संपर्क साधावा. नियमांचे पालन न केल्यास तळा द्वारा दंडात्मक कारवाई तथा सदर बांधकाम अनधिकृत घोषित करून त्याबाबत कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | (Septic Tanks) IS: 2470 Design विषयी तांत्रिक सहाय्य करीता | बांधकाम विभाग | ९०९६३३७३६० |
| २ | या बाबत तक्रार किंवा इतर आवश्यक माहिती करिता | स्वच्छता विभाग | ८२३७०१६०८० |

सही/-
**(मनीषा नागसेन वजाळे)**
**मुख्याधिकारी**
**तळा नगरपंचायत तळा**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक १) मोनिका समीर साळोखे व २) समीर यशवंत साळोखे यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ३ | २१ | ०-०४-८० | ०-११ |

सबब सदर वर नमुद केलेल्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर नमुद केलेली मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/११/२०२४

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत,ता.कर्जत,
जि. रायगड ४१०२०१.

# बाळाराम पाटलांना वाढता पाठिंबा

## ■ शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, काँग्रेसचीही शेतकरी कामगार पक्षाला साथ

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पनवेल विधानसभा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार बाळाराम पाटील यांच्या प्रचाराचा झंझावात पाहायला मिळत असून, मतदारांचा पाठिंबा वाढत आहे. दरम्यान, महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या शरद पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसनेसुद्धा बाळाराम पाटील यांना पाठिंबा दिला आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना नवा जोश निर्माण झाला असून, तळागाळातील जनता बाळाराम पाटील यांच्या पाठीशी आहे.



शरद पवारांनी आदेश दिल्याने पनवेलमधील राष्ट्रवादी शेकापचे उमेदवार बाळाराम पाटील यांच्या पाठीशी ठाम असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे पनवेल शहर जिल्हाध्यक्ष सतीश पाटील यांनी दिली. तसेच महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेस पक्षातील स्थानिक कार्यकर्तेदेखील बाळाराम पाटलांबरोबरच असल्याची माहिती काँग्रेसच्या पनवेल शहर जिल्हा कमिटीचे अध्यक्ष सुदाम पाटील यांनी दिली आहे.

राज्यात विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर लोकसभेला महाविकास आघाडी म्हणून सामोरे गेलेले शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना हे पक्ष एकत्रित लढले होते. परंतु, या निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने आपला उमेदवार उभा केला.

> “वरिष्ठांनी दिलेल्या आदेशानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट शेकाप उमेदवार बाळाराम पाटील यांच्या पाठीशी ठाम असून, बाळाराम पाटील यांच्या विजयासाठीच आमचा पक्ष काम करणार आहे.
> – सतीश पाटील, अध्यक्ष, पनवेल शहर राष्ट्रवादी शरद पवार गट”

> “पनवेलमध्ये काँग्रेस पक्ष जिवंत ठेवण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांना शेकापचे उमेदवार बाळाराम पाटील यांच्यासोबतच राहावे लागणार या मतावर कार्यकर्ते ठाम आहेत. म्हणूनच आम्ही बाळाराम पाटील यांच्या विजयासाठी प्रचार करत आहोत.
> – सुदाम पाटील, अध्यक्ष पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटी”

परंतु, आघाडीतील प्रमुख पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट आणि काँग्रेस पक्षातील स्थानिक वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी शेकापसोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यामुळे प्रचंड मताधिक्यांनी बाळाराम पाटील यांचा विजय होणार, असा विश्वास तिन्ही पक्षातील कार्यकर्ते बोलून दाखवत आहेत. बाळाराम पाटील यांनी गावभेटी घेत प्रचाराचा धडाका लावला असून, सामान्य जतनेतून त्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहेत.

# रायगड काँग्रेस प्रचारात सक्रिय

**। उरण । वार्ताहर ।**

महाविकास आघाडीचा महत्त्वाचा घटक असलेल्या काँग्रेसला रायगड जिल्ह्यात एक जागाही न दिल्याने काँग्रेस पक्ष रुसला होता. मात्र महाविकास आघाडी आणि उमेदवारांमध्ये चर्चा झाल्यानंतर काँग्रेसचे कार्यकर्ते विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात सक्रिय झाले असल्याची माहिती रायगड जिल्हा काँग्रेसचे नेते महेंद्र घरत यांनी दिली आहे.

रायगड जिल्ह्यात काँग्रेस व शेतकरी कामगार पक्ष हे दोन पक्ष आणि त्यांच्यातील लढती होत होत्या. अनेकदा जिल्ह्याचे खासदार, आमदार निवडून आले आहेत. मात्र २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत रायगड जिल्ह्यात महाविकास आघाडीकडून काँग्रेसला एकही जागा न दिल्याने जिल्ह्यातील काँग्रेसचे कार्यकर्ते रुसले होते. त्यानंतर भर सभेत काँग्रेसचे

**महेंद्र घरत यांची माहिती**

जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. जोपर्यंत महाविकास आघाडीचे उमेदवार येऊन काँग्रेस कार्यकर्त्यांशी चर्चा करून पुढील दिशा ठरवत नाहीत तोपर्यंत निवडणूक प्रचारात सक्रिय न होण्याची भूमिका घेतली होती.

त्यानंतर उरण विधानसभा मतदारसंघातील शिवसेना ठाकरे गटाचे व महाविकास आघाडीचे उमेदवार मनोहर भोईर यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांची भेट घेत चर्चा केली. त्यामुळे महाविकास आघाडी मजबूत करण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांना प्रचारात उतरून जोमाने काम करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती काँग्रेसचे नेते महेंद्र घरत यांनी दिली आहे.



● सागाव येथील मारूती देवस्थानचे दर्शन घेतल्यानंतर महाविकास आघाडी पुरस्कृत शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांच्या प्रचाराला सुरूवात करण्यात आली. यावेळी तरूण नेतृत्व स्वयंस्फूर्तीने प्रचारासाठी सहभागी झाले.
(छायाचित्र : समीर मालोदे)

## सोन्याची चेन आणि माळ चोरली

**नवीनपनवेल:** मोटरसायकल वरून आलेल्या इसमांनी ५२ वर्षीय महिलेच्या गळ्यातील २० ग्राम वजनाची सोन्याची चेन आणि माळ जबरीने खेचून नेली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. संध्या मेहेत्रे या ५ नोव्हेंबर रोजी लॅबोरेटरी मध्ये डायबिटीसची तपासणी करण्यासाठी गेल्या होत्या. त्या पायी चालत सीकेटी कॉलेज सेक्टर ११, खांदा कॉलनी येथे गेल्या. सेकटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर बालग्राम महाराष्ट्र, सेक्टर १२, खांदा कॉलनी या संस्थेच्या इमारती समोरून चालत जात असताना दोन अनोळखी इसम काळ्या रंगाच्या मोटरसायकल वरून पाठीमागून आले आणि त्यांनी संध्या यांच्या गळ्यातील सोन्याची चेन आणि सोन्याची माळ जबरीने खेचून ते पळून गेले.

# आसुडगाव शाळेचा होणार कायापालट

**नवीन पनवेल :** अदानी फाउंडेशन तर्फे जिल्हा परिषद शाळा आसूडगाव या ठिकाणी शाळेसाठी ६१ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या निधीतून शाळेचा कायापालट होणार आहे. माजी सरपंच शशिकांत शेळके यांच्या प्रयत्नातून ही कामे करण्यात येणार आहेत. यावेळी शिक्षिका वृंदा धामणस्कर यांनी अदानी फाउंडेशनचे आभार मानले.

आसुडगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत तब्बल साडेतीनशे होऊन अधिक विद्यार्थी- विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. या ठिकाणी नवीन वर्गखोल्या, अंगणवाडी, सुसज्ज मैदान तसेच इतर अनेक सुखसोई उपलब्ध व्हाव्यात यासाठी माजी सरपंच शशिकांत शेळके यांनी अदानी फाउंडेशनकडे वारंवार पाठपुरावा केला. त्यानुसार अंगणवाडी दुरुस्ती, वर्ग खोली बांधकाम, शाळेचे रंगकाम आणि सुशोभिकरण, ग्राउंड लेव्हलिंग, नवीन दोन वर्ग खोल्या बांधकाम, शौचालय बांधकाम, कंपाउंड वॉल, भिंत बांधकाम, शाळा डिजिटल आणि स्मार्ट करणे या विविध कामांसाठी ६१ लाख रुपये मंजूर करण्यात आले असल्याची माहिती सुदीप दास गुप्ता सीएमओ, जयश्वर अधिकारी, राकेश कुमार, विजयकुमार, श्रीधर कोटयाल, संजय कुमार मोरे यांनी दिली. यावेळी गुप्ता यांनी आसुडगाव शाळा स्मार्ट करण्याचे उद्दिष्ट असून यातून चांगले विद्यार्थी घडावेत अशी आशा व्यक्त केली.

# लाडक्या बहिणींच्या डोळ्यात अश्रू

## ■ वाढत्या महागाईने आर्थिक गणित बिघडले

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ आतापर्यंत मिळाला असला तरी अजूनही अनेक महिला या योजनेपासून वंचित आहेत. मात्र, योजना जाहीर झाल्यापासून महागाईमध्ये झालेल्या वाढीमुळे लाडक्या बहिणींचे आर्थिक गणित बिघडले असून, घर चालवायचे कसे, या चिंतेने त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहत आहेत.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंमलात आल्यापासून महागाईने लाडक्या बहिणीच्या डोळ्यांत पाणी आणले आहे. प्रत्येक घरात घरखर्च चालवणारी ही महिलाच असते. आपल्या कुटुंबातील दैनंदिन संसारोपयोगी घरखर्चाकडे सर्वात जास्त महिलाच लक्ष देत असतात. मात्र, काही दिवसांपूर्वी संसारोपयोगी वस्तूंचे भाव भडकले आहेत. यात खोबरे १४० रुपये प्रति किलो होते. आज रोजी २६० रुपये प्रतिकिलो आहे. गोडेतेल १०५ रुपये प्रतिलीटर होते. आज रोजी १४५ रुपये प्रतिलीटर आहे. लसूण १०० रुपये प्रतिकिलो होता. आज रोजी ४०० चा आकडा पार केला आहे. मुद्रांक (स्टॅम्प पेपर) १०० रुपये होता.

आता ५०० रुपयांचा मुद्रांक पेपर केल्याने सर्वसामान्य जनतेची शंभर रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर होणारी शासकीय कामे आता पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरने करावी लागत आहेत. लाडकी बहीण योजनेमुळे सर्व गोष्टींवर महागाई वाढली असल्याची चर्चा नागरिकांतून होत आहे.

एकीकडे दान केल्याचे काम करीत असल्याचे जनतेला भासवायचे, आणि दुसरीकडे जनतेकडून चक्रवाढ व्याजाने पैसे उकळण्याचा डाव सरकारचा आहे, असा आरोप नागरिकांकडून होत आहे. मुलींना मोफत शिक्षण ही फक्त घोषणाबाजी आहे. कोणत्या मुलींना मोफत शिक्षण देत आहात. ते सांगा? अगदी प्राथमिक शाळेपासून ते माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील मुलींनासुद्धा मोफत शिक्षण मिळत नाही. फक्त निवडणुका जवळ येऊ लागल्या की विविध योजनांचे लाभ दिले जातात. परंतु, त्याच्या दुप्पट महागाईच्या मार्गाने जनतेकडून वसुली केली जात आहे.

# पळस्पे फाटा येथे दोन लाखांची रोकड जप्त

**स्थिर सर्वेक्षण पथकाची कारवाई**

**। पनवेल । वार्ताहर ।**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ ऑक्टोबरपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. पनवेल १८८ विधानसभा मतदारसंघ, निवडणूक विभाग अंतर्गत आचारसंहिता पथकांतर्गत स्थिर सर्वेक्षण पथक क्र.०३ (एसएसटी- ०३ पथक) ने गुरुवारी (दि. ७) मुंबई-गोवा हायवे येथील पळस्पे फाटा चेक नाका येथे रस्त्यावरुन जाणाऱ्या पांढऱ्या



यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विजय पाटील, आचारसंहिता पथक प्रमुख भारत राठोड, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, संदिप कराड, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, नितेश चिमणे, आशा डोळस, तसेच स्थिर सर्वेक्षण पथक क्र.०३ पथकाचे प्रमुख संतोष पाटील, सहा. पथक प्रमुख संदीप पगडे, खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पो.शि. काशिनाथ चव्हाण व म.पो.शि. सरला जाधव आदी उपस्थित होते.

## लॅपटॉपची चोरी

**नवीन पनवेल :** घरामध्ये प्रवेश करून घरातील लॅपटॉप चोरी केल्याप्रकरणी चोराविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी अज्ञात चोराचा तपास सुरू केला आहे.

अनिल शिवराम पाटील हे घोटगाव येथे राहत असून पाच नोव्हेंबर रोजी ते घरातील बेडरूम मध्ये झोपले होते. सकाळी उठल्यानंतर त्यांना लॅपटॉप दिसून आला नाही. अनोळखी इसमाने घरात प्रवेश करून टीव्हीच्या टेबल जवळ ठेवलेला लॅपटॉप चोरून नेला.

# मुरुड पंचक्रोशीत भातकापणीला वेग

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील ३३०० हेक्टर भात पिकाखाली क्षेत्र असून, यावेळी शेतकऱ्यांनी ३००० हेक्टरात भातपिकासाठी सुवर्णा, रूपाली, शुभांगी, कर्जत, चिंटू, साई, जया आदींसह पिकांची लागवड केली होती. यावर्षी वरूणराजाच्या कृपादृष्टीमुळे शेतामध्ये समाधानकारक शेतीयुक्त पाऊस पडल्याने मोठ्या प्रमाणात पीक आले. यामुळे सर्व धरतीवर जणू सोनेरी शाल परिधान केलेली दिसून येत आहे. चार महिने अथक परिश्रम घेऊन बळीराजाला आता



भाताचा दाणा पहावयास मिळाला आहे. यामुळे शेतकरी आनंदीत झाला होता.

शेतकरी वर्गाकडून भातकापणी व झोडणीच्या कामांना सुरूवात करण्यात आली. आता सर्वच ठिकाणी झोडणीची लगबग दिसून येत आहे. ऑक्टोबर हिट व त्यामुळे अंगातून बरसणाऱ्या घामाच्या धारा यांची कोणतीही पर्वा न करता शेतकरी कामात गुंतला आहे. त्यातच शेतीच्या कामासाठी आवश्यक मजूरही मिळत नसल्याने थोडी तारांबळ उडत आहे.

## हॉटेलमधून मद्य जप्त

**पनवेल :** हॉटेलमध्ये छापा टाकून पोलिसांनी ३१ हजार ३४० रुपयांचे मद्य जप्त केले आहे. या प्रकरणी आरोपी प्रमोद छोटू सिंग याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नवी मुंबई गुन्हेशाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना, हॉटेल शिवकृपा व्हेज आणि नॉनव्हेज, कोन फाटा या ठिकाणी विनापरवाना मद्य विक्री होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पथकाने सदरठिकाणी छापा टाकला. यावेळी ३१ हजार रुपयांचे मद्य जप्त करण्यात आले.

# समीक्षा पाटीलची गरुडझेप

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

सारडे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच समीर पाटील यांची सुकन्या समीक्षा पाटील हिने मर्चंट नेव्ही करिअरमध्ये नेत्रदीपक यश संपादन केले आहे. तिची हाँगकाँग फळगशिप परदेशात टर्की येथे निवड करण्यात आली असून, तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तिच्या यशाबद्दल काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जीवन म्हात्रे, राजू म्हात्रे, योगानंद म्हात्रे, डॉ. सिधू, तुळशीदास पाटील, नरेंद म्हात्रे, रणजित गावंड आदी ग्रामस्थांनी अभिनंदन केले.




# सीताफळात किडीचे साम्राज्य

**। रसायनी । वार्ताहर ।**

बाजारात आलेल्या सीताफळात किडी असल्याचे दिसत असल्याने नीट तपासून घेणे गरजेचे आहे.

सध्या सीताफळांचा हंगाम सुरू आहे. त्यामुळे त्यांची बाजारात आवक वाढली आहे. बाजारपेठ, राष्ट्रीय महामार्ग, अन्य मार्गावर सीताफळ जास्त प्रमाणात दिसत असून, भरघोस पीक आल्याने त्याची विक्री कमी दराने होत असल्याने त्याला गिऱ्हाईकदेखील जास्त प्रमाणात दिसत आहे. जवळपासच्या सर्व बाजारपेठेत आवक जास्त असली तरी राष्ट्रीय महामार्ग, पलस्पे फाटा व अन्य मोक्याच्या ठिकाणी, त्याचप्रमाणे हात गाडीवरदेखील सीताफळाची विक्री होताना दिसत आहे. शंभर रुपयाला सव्वा ते दीड किलो सीताफळ मिळत असल्याने गाडीवाले रस्त्यावर गाडी लावून ती खरेदी करताना दिसत आहेत. ज्या मोसमात जे फळ येते तेच जास्त प्रमाणात खावे असे सांगितले जाते, आणि ते खरेही आहे,पण सद्या उपलब्ध असलेली सीताफळे यात किडी असल्याचे दिसत आहे. ग्रुप ग्रामपंचायत लोधिवलीचे ग्रामपंचायत सदस्य सुभाष शिंदे यांनीही स्वस्त आणि मोठे फळ दिसल्याने सिताफळांची खरेदी केली, घरी आल्यावर त्यांनी तयार झालेली सीताफळे फोडली असता त्यांना त्यात किडी दिसल्या, म्हणून त्यांनी दुसरे सीताफळ फोडले



असता, त्यातही किडी असल्याचे त्यांनी सांगितले, बघता बघता सर्वच फळांत किडीच आढळल्या. त्यामुळे सीताफळ विकत घेताना व ती खाताना नीट लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# पाम बीच मार्गावरील अपघातात एक ठार, दोन गंभीर जखमी

**नवी मुंबई :** पाम बीच मार्गावर झालेल्या अपघातात एक जण ठार झाला असून दोन जण गंभीर जखमी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. एका कारला पाठीमागून येणाऱ्या भरधाव जीपने जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला. या अपघातात मनीष पेडणेकर यांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांच्या पत्नी स्नेहा आणि मुलगी अनन्या गंभीर जखमी झाले आहेत. अपघात झाल्यानंतर वाहनचालक पळून गेला होता. पोलिसांनी त्याचा शोध घेऊन नंतर त्याला अटक केली.पोलिसांनी ओंकार मोरे याला अटक करून त्याला न्यायालयात हजर केले असता ९ तारखेपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. वाहनचालक मोरे याने मद्यप्राशन केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● प्रथम पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

● अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत. पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९ वेळ : सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत

● नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. अकाऊंटंट (पेमेंट - १२०००) २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२

● वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत १० वी १२ वी पास/नापास पगार १२००० रूपये १२ तास ड्युटी ठिकाण- बामणसुरे, चोंढी नंबर- ९१४५४५०२९७/ ९५७९२५८८९२

● मार्केटिंग करिता स्थानिक अनुभवी प्रतिनिधी पाहिजेत. अलिबाग, कर्जत, खोपोली, माणगाव, महाड salary plus incentive as per experience Send your biodata on WhatsApp number 9769112233

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## गडकिल्ल्यात आई मातोश्री ग्रुप, तर रांगोळी स्पर्धेत कशिश कडू प्रथम

# गडकिल्ले, रांगोळी स्पर्धेला उत्तम प्रतिसाद

**। उरण । वार्ताहर ।**


गडकिल्ल्यांची सर्वांना ओळख व्हावी, गडकिल्लेच्या माध्यमातून महाराष्ट्राचा इतिहास सर्वांना ज्ञात व्हावा, गड किल्ल्यांचे जतन व्हावे, संरक्षण संवर्धन व्हावे या दृष्टीकोनातून गड किल्ले स्पर्धाचे तसेच रांगोळी कलेविषयी जनजागृती व्हावी, नवनवीन कलाकार तयार व्हावेत. हे कलाकार राष्ट्रीय पातळीवर चमकावेत या दृष्टीकोनातून रांगोळी स्पर्धेचे आयोजन युवा संघटना सोनारीच्या माध्यमातून श्री सिद्धिविनायक मंदिर, सोनारी, उरण तालुका येथे आयोजित करण्यात आले होते. या स्पर्धेला जनतेचा, नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस, सन्मानचिन्हे देऊन सन्मान करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सत्या कडू, राकेश नरेश कडू, दिपक चिंतामण कडू, सुरेश कडू, हितेश कडू, अंकुश तांडेल, प्रशांत कडू आदी मान्यवर उपस्थित होते.

युवा संघटना सोनारीतर्फे आयोजित केलेल्या गडकिल्ले स्पर्धेत प्रथम क्रमांक आई मातोश्री ग्रुप सोनारी, द्वितीय क्रमांक लव्या म्हात्रे, कृपा म्हात्रे मनन म्हात्रे यांनी, तर









तृतीय क्रमांक जय शिवराय ग्रुप सोनारी यांनी पटकविला. तसेच रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक कशिश कडू, द्वितीय क्रमांक स्मिता भोईर, तृतीय क्रमांक वांशिका तांडेल यांनी पटकाविले.

या कार्यक्रमासाठी युवा संघटना सोनारी व राकेश कडू मित्र परिवाराच्या सर्व पदाधिकारी सदस्यांनी मेहनत घेतली.

युवा संघटना सोनारी यांनी या स्पर्धेच्या माध्यमातून समाजामध्ये एक संदेशदेखील दिलेला आहे आपली संस्कृती परंपरा गडकिल्ले त्यांचा इतिहास यांची माहिती व त्यांचा जतन संवर्धन येणाऱ्या पिढीकडून व्हावे हाच स्पर्धेच्या माध्यमातून संदेश देण्यात आला. युवा संघटना सोनारी यांच्या संकल्पनेतून पहिल्यांदाच या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याला जनतेचाही उत्तम प्रतिसाद लाभला. नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई

# ४० लाखांची दारू जप्त



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**महाराष्ट्र विधानसभा निवडणूक-२०२४ च्या कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत परराज्यातील दारू तसेच ४ वाहनांसह ४० लाख ६४ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

राज्य उत्पादन शुल्क, मुंबई विभागाचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, संचालक प्रसाद सुर्वे, पुणे विभागीय उपायुक्त सागर धोमकर, अधीक्षक, चरणसिंग राजपूत, उपअधीक्षक, संतोष जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क डी विभागाकडून २७ ऑक्टोबर २०२४ रोजी घोटावडे गावच्या हद्दीत, आंबटवेट रोडवर दारूबंदी गुन्ह्याकामी सापळा लावून टाटा कंपनीचे एस गोल्ड या प्रकाराचे चारचाकी वाहन क्र. एमएच १२ टीव्ही ५१२२ पकडले. या वाहनामधून गोवा राज्य निर्मित व महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंधित असलेली विदेशी दारूचे एकूण १८ बॉक्स (८६६ सिलबंद बाटल्या) तसेच महाराष्ट्र राज्याचे बनावट लेबल असा एकूण ३ लाख ५५ हजार १४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीस अटक करण्यात आली.

न्यायालयाने आरोपीस ३ दिवस एक्साईज कोठडी मंजूर केली. पुढील तपासात ४ नोव्हेंबर २०२४ रोजी कोथरूड, कर्वे पुतळ्याजवळ तपासाकामी छापा टाकला असता सदर गुन्ह्यासाठी वापरण्यात येणारे विविध ब्रॅन्डचे विदेशी मद्याचे एकूण १०,००० नग बनावट लेबलसह सापडले आहे. याची एकूण किंमत ८८,१६० रुपये आहे. या गुन्ह्यातील पुढील तपासात दिनांक ६ नोव्हेंबर २०२४ रोजी शनिवार पेठ, येथून बनावट लेबल छपाई करण्यासाठी वापरण्यात आलेल्या मशीनसह एकूण ३० लाख २ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या गुन्ह्यात एकूण ३४ लाख ४५ हजार ५५० रुपयांच्या मुद्देमालासह एकूण तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, डी विभाग सचिन श्रीवास्तव, ई विभागाचे निरीक्षक, शैलेश शिंदे, स.दु.नि. स्वप्नील दरेकर, स.दु.नि.सागर धुर्वे, जवान श्री. गजानन सोळंके, जवान श्री. संजय गोरे, यांनी सदर कारवाई मध्ये सहभाग घेतला असून पुढील तपास निरीक्षक, सचिन श्रीवास्तव करीत आहेत.

या विभागाने १ ऑक्टोबर २०२४ पासून आजपर्यंत एकूण ३१ गुन्हे नोंद करून ३१ आरोपींना अटक करून ४ वाहनांसह एकूण ४० लाख ६४ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये गावठी दारू ९९१ लिटर, कच्चे रसायन १६०० लिटर, ताडी २२७ लिटर, देशी दारू ३३.०० ब. लि., बिअर २५५ ब. लि. व परराज्यातील गोवा निर्मित मद्य एकूण १५५.८८ ब. लि. यांचा समावेश आहे.



## मांडवा सागरी पोलिसांचा चोंढी, झिराड येथे रुटमार्च

**। सोगाव । वार्ताहर ।**

आगामी सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मांडवा सागरी पोलीस ठाण्यातर्फे चोंढी व झिराड येथे गुरुवारी (दि. ७) संध्याकाळी पाच वाजल्यापासून ६ वाजेपर्यंत रुटमार्च काढण्यात आला.

मांडवा सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मांडवा सागरी पोलीस सज्ज झाले असून, निवडणुकीत कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच आचारसंहितेचा भंग होऊ नये व विधानसभा निवडणुका निर्विवाद आणि शांततेत पार पाडण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी अलिबाग विनित चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली झिराड येथे मांडवा पोलीस ठाणे ते पाटील पोल्ट्री-बाजारपेठ-वैभव हॉटेल-स्टेट बँक तसेच चोंढी येथे चोंढी नाका-अपना बाजार-रेल्वे फाटक-मुख्य बाजारपेठ-चोंढी पूल याठिकाणी पद पथसंचलन (रूटमार्च) करण्यात आले. यावेळी मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे २ अधिकारी, १० अंमलदार तसेच सीआयएसफचे ४६ जवान उपस्थित होते.

## उल्हास नदीच्या पुलाखाली आढळला बेवारस मृतदेह

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील चांधई येथून वाहणारी उल्हास नदीच्या पात्रात पुलाखाली ७ तारखेला एक बेवारस मृतदेह आढळला होता. ग्रामस्थांनी सदर घटनेची माहिती चांधई गावचे पोलीस पाटील सचिन कोळंबे यांना दिली असता त्यांनी सदर घटनेची पडताळणी करून कर्जत पोलिसांना पाचारण केले.

चांधई येथील उल्हास नदीला असलेल्या जुन्या पुलाखाली उल्हास नदीच्या पात्रात एक ५० ते ६० वयाची मृत व्यक्ती ग्रामस्थांना आढळून आली होती. त्याची माहिती गावकऱ्यांनी तात्काळ पोलीस पाटील यांना देऊन घटनेची चौकशी करण्याची मागणी केली. पोलीस पाटील यांनी कर्जत पोलीस स्थानकात सदर घटनेची माहिती देताच काही वेळातच पोलीस अधिकारी दुसाणे, लोहकरे यांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेऊन घटनेची चौकशी केली. पंचनामा करतेवेळी त्या व्यक्तीच्या डोक्याच्या मागच्या भागात जबर जखम दिसून आली. तसेच संध्याकाळ ७ पर्यंत इथे काहीही नव्हते, मग हा झालेला प्रकार ७ ते ८ च्याच दरम्यानचा असावा, अशी शंका व्यक्त केली जात आहे.

या व्यक्तीच्या अंगावर शर्ट व हाफ पँट असल्याची बघायला मिळाली. सदर घटना हत्या आहे की आत्महत्या? याची सगळीकडे चर्चा होताना पहायला मिळत आहे.

## नितीन पेंडसे यांना वास्तूशास्त्र पुरस्कार

**माणगाव** : नितीन दत्तात्रेय पेंडसे यांना पुणे येथे नुकताच ज्योतिष आणि वास्तूशास्त्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुणे येथील ज्योतिष वास्तू विश्व संशोधन केंद्राच्या वतीने आयोजित तृतीय पदवीदान समारंभात डॉ. वेदमूती, उमेश कुलकर्णी गुरुजी यांच्या हस्ते नितीन पेंडसे यांना पुणेरी पगडी व सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्योतिष पंडित चंद्रकांत शेवाळे, अंकशाळा तज्ज्ञ व लेखिका ॲड. सुनीता पागे, आखिल भारतीय ज्योतिष परिषदेचे अध्यक्ष अनिल चांदवडकर व अंजली पोतदार आदी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## नरेश जोशी होणार पवार गटाचे जिल्हाध्यक्ष?

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



आंबिवलीचे नरेश जोशी हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार नवीन जिल्हाध्यक्ष असतील असे राजकीय सूत्रांकडून सांगण्यात आले आहे. नरेश जोशी हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश प्रतिनिधी असून, प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुरेश टोकरे यांनी काही दिवसांपैकी शिवसेना पक्षात प्रवेश केल्याने राष्ट्रवादी पवार पक्षाचे जिल्हा अध्यक्षपद रिक्त आहे.

जिल्हाध्यक्ष पद रिक्त असल्याने कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर नवीन जिल्हाध्यक्ष नेमण्याच्या हालचालींना वेग आला आहे. नरेश जोशी हे जयंत पाटील यांचे विश्वासू समजले जात असून, त्यांच्या गळ्यात रायगड जिल्हाध्यक्षपदाची माळ पडण्याची शक्यता आहे.

## मुरुडमध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

**। मुरुड शहर । वार्ताहर ।**

लायन्स क्लब ऑफ मुरुड जंजिराच्या माध्यमातून ऑक्टोबर महिन्यात तीन नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले होते. त्यातील तीस जणांच्या मोतिबिंदू शस्त्रक्रिया चोंढी अलिबाग येथे मोफत करण्यात आल्या. नोव्हेंबर महिन्यात बँक ऑफ इंडियाच्या सहकार्याने आपण मुरुड शहरातील व्हिजन सेंटर येथे व आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या सहकार्याने संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त मुरुड बाजारपेठ येथील आदर्श नागरी सहकारी पतसंस्थांच्या शाखेत अशा दोन नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

## आरोग्य तपासणी शिबिराचा शेकडो नागरिकांनी घेतला लाभ

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

साधू वासवाणी मेडिकल सेंटर खंडाळा, साधू वासवाणी मिशन पुणे संस्था तसेच बीयॉन्ड बॉर्डर या सामाजिक संस्था गेल्या अनेक वर्षापासून समाज उपयोगी कार्यक्रम हाती घेत असताना ७ नोव्हेंबर रोजी सोलापूर तालुक्यातील ग्रामीण नावंढेवाडी गावात आरोग्य तपासणी शिबीर संपन्न झाले. या शिबिरात शेकडो ग्रामस्थांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतल्याने आयोजकांची ग्रामस्थांनी आभार मानले.

यावेळी साधू वासवाणी संस्थेचे संचालक लाल आडवाणी, वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल गुरव, वैद्यकीय अधिकारी डॉ. केशरसिंग पाटील, लॅब टेक्निशियन शैलजा भांगरे, अश्विनी पाठारे, बाजीराव शिर्के, रामदास गायकवाड, रवी जानकर, राजेश कदम, बीयॉन्ड बॉर्डर संस्थेचे फारुख शेख तसेच ऑस्ट्रेलियामधील डॉ. मेसी थॉमस, डॉ. जोजा, डॉ. ग्रेस, डॉ. हेअली, डॉ. कोब्बी, डॉ. मेयात, डॉ. क्रेसिन आदी प्रमुखांसह नावंढे ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

या शिबिरामध्ये सर्दी, खोकला, ताप, पोट दुखी, अंगदुखी, सांधेदुखी, अशक्तपणा, पोटातील जंतू त्वचारोग तपासणी करत इतर तक्रारींवर मोफत तपासणी करीत औषध उपचार देत मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरात शेकडो ग्रामस्थांनी हजेरी लावली.

पान १ वरून

### तटकरेंवर शिंदे गटाची नाराजी

महायुतीकडून राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या अदिती तटकरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मतदारसंघात मुस्लिम समाजाने लोकसभेला घेतलेला निर्णय विधानसभेत जशास तसे राहिल्यास आदिती तटकरे यांना याचा मोठा फटका बसू शकतो. कारण, श्रीवर्धन मतदारसंघात मुस्लिम मतांची गोळाबेरीज केल्यास ३५ हजारांहून अधिक मते आहेत. ओबीसी समाज हादेखील सुनील तटकरे यांच्या बाजूने असला तरी मतदान पेटीत समाजाकडून उभे असलेल्या उमेदवाराला की पूर्वी आणि आता चर्चेत असलेल्या उमेदवाराला मतदान होईल, हे येणारा २३ तारखेचा दिवसच ठरवेल. येत्या १३ नोव्हेंबरला शरद पवारांची श्रीवर्धनमध्ये सभा होणार आहे. या सभेकडेदेखील साऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे. शरद पवार सुनील तटकरे यांच्यावर कोणती तोफ टाकतील, हे ऐकण्यासाठी मतदारराजा आतुर झालेला पहायला मिळत आहे.

### शिंदेंच्या पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

युवासेना नेते रूपेश पाटील यांच्या येथील भयानक राजनीतीने बाधित होतो. वरिष्ठ पातळीवर पाटील यांच्या संघटनेला बाधक व विनाशकारी ठरणाऱ्या कृतीबाबत अनेक वेळा तक्रार करूनही दखल घेतली जात नसल्यामुळे आम्ही शिवसेनेचा व शिवसेना पदांचा सामूहिकरित्या राजीनामा देत आहोत, अशी माहिती कृष्णा पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. शिंदे गटाच्या या राजीनाम्यांमुळे महायुतीच्या उमेदवाराला मोठा फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### ईडीच्या भीतीने भाजपसोबत गेलो

वागवलं नसतं, असेही भुजबळ म्हणाले. मी दोन ते अडीच वर्षे तुरुंगात काढली. मला जामीन मिळाल्यानंतरही मला पुन्हा ईडीची नोटीस आली. मी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली आता आणखी किती चौकशांना सामोरं जायचं, असा माझ्यापुढे प्रश्न होता. आधीच १०० कोटी रुपयांच्या आरोपांवरून अनिल देशमुखांना ईडीने अटक केली होती. भाजपमध्ये आलात तरच सुटका होईल, असा निरोप देशमुखांना आला होता असे भुजबळ म्हणाले. देशमुखांनंतर मलाही परत अडकवतील, अशी भीती होती. तुरुंगातले दिवस आठवले तर माझी झोप उडते, या वयातली ईडी माझा पिच्छा सोडायला तयार नव्हती, असेही भुजबळांनी म्हटले.

फक्त अजित पवारच नाही तर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, हसन मुश्रीफ, अनिल देशमुख आणि नवाब मलिक यांचीही ईडीची चौकशी सुरू होती. मला, नवाब मलिक आणि अनिल देशमुखांना ईडीने अटकही केली होती. त्यामुळे अशा वेळी भाजपसोबत हातमिळवणी करावी, त्याशिवाय सुटका नाही, अशी भावना सर्व नेत्यांची झाली होती. आम्ही शरद पवार यांच्याकडे हा विषय काढला. पवार साहेबांचा भाजपसोबत जाण्यास विरोध होता. त्यामुळे अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षातील आमदारांनी भाजपसोबत हातमिळवणी करण्याचे ठरवले. पक्षातील बहुतांश नेत्यांनही हा निर्णय मान्य केला. भाजपसोबत युती केल्यानंतर सर्व नेत्यांची ईडीपासून सुटका झाली, असेही भुजबळ म्हणाले.

### एकजूट व्हा,युती सरकार घालवा

आवाहन जयंत पाटील यांनी केले.

पुढे ते म्हणाले, राज्याच्या राजकारणात वेगळी परिस्थिती निर्माण झाली आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार म्हणून विधानसभेत गेले पाहिजेत. निवडणुकीच्या निमित्ताने चित्रलेखा पाटील यांच्या प्रचारासाठी तळागाळातील काँग्रेसचा कार्यकर्ता एकत्र आला आहे. चित्रलेखा पाटील यांना निवडून देण्यासाठी कार्यकर्ता बाहेर पडला आहे, त्यामुळे चित्रलेखा पाटील भाग्यवान आहेत. एक-एक मत मिळवण्याचे काम केल्यास आपला विजय हा नक्कीच होणार आहे. उमेदवार तुम्ही आहात या भावनेतून काम करून विरोधकांना घरी बसवा, असे आवाहन जयंत पाटील यांनी केले.

यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, काँग्रेसचे राज्य प्रदेश सचिव ॲड. प्रवीण ठाकूर, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भास्कर चव्हाण, योगेश मगर आदी मान्यवरांनीदेखील मनोगत व्यक्त करीत उपस्थितांना संबोधित केले.

### दळवींचं आश्वासन, पाण्यासाठी वणवण

शेणवई, डोंगरी, शेणवई आदिवासीवाडी, वावेखार, वावेपोटगे, यशवंतखार, करंजवीरा, सानेगाव, दापोली, कोपरी, धोंडखार आदी २६ गावे कुंडलिका तीराजवळ वसली आहेत. या गावांना मार्च महिन्यापासून पावसाळा सुरु होईपर्यंत पाण्याची टंचाई कायमच भेडसावत आहे. पाण्यासाठी दोन दोन किलोमीटर पायपीट करावी लागते.

रोहा तालुक्यातील २६ गावांना पाणीपुरवठा योजनेचे सर्वतोपरी दायित्व हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचेच आहे. त्यामुळे २६ गावे पाणीपुरवठा योजना पूर्ण करून देखभालही एमआयडीसीनेच करायची असल्याचे ठाम मत शेकाप नेते माजी आमदार पंडित पाटील यांनी ऑक्टोबर २०२१ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीत मांडले होते. यावेळी उपजिल्हाधिकारी, एमआयडीसीचे अधिकारी, पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी व २६ गावांतील ग्रामस्थ उपस्थित होते. त्यामुळे त्यावेळी एमआयडीसीमार्फत गावांना पाणीपुरवठा करण्यास सुरुवात झाली होती.

विद्यमान आमदार दळवी यांनी २६ गावांसाठी जलजीवन योजना सुरु करण्याचे आश्वासन दिले. त्याची बॅनरबाजीदेखील आमदारांनी केली होती. मात्र, अजूनपर्यंत हे काम अपूर्णच असल्याचे चित्र आहे. गावातील रस्ते खोदून पाईप टाकण्यात आले आहेत. तेदेखील अपूर्ण स्थितीत आहेत. गावांमध्ये साठवण टाकी तसेच जलशुध्दीकरण केंद्राचा अभावदेखील आहे. रोह्यामधील २६ गावांतील जलजीवन योजना ठप्प झाल्याचे दिसून येत आहे. घरामध्ये २४ तास मुबलक पाणीपुरवठा होईल, असे आश्वासन आमदारांनी दिले होते. मात्र, अजूनपर्यंत या योजनेचे कामच पूर्ण झाले नसल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली.

### आ. गोगावलेंनी घेतला धसका

आणि महाविकास आघाडी यामध्ये जोरदार रस्सीखेच सुरू आहे.

यामध्ये शिवसेनेचे भरत मारुती गोगावले, उबाठाच्या स्नेहल माणिक जगताप, बहुजन समाज पार्टीच्या अमृता अरुण वाघमारे, वंचित बहुजन आघाडीचे अनंदराज रवींद्र घाडगे, अपक्ष प्रज्ञा लक्ष्मण खांबे यांचा समावेश आहे. उमेदवार जरी पाच असले, तरी खरी लढत ही शिवसेनेचे भरत गोगावले व उबाठाच्या स्नेहल जगताप यांच्यात होणार आहे. गोगावले हे तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले असून, ही त्यांची चौथी वेळ आहे. मात्र, भरत गोगावले यांनी मतदान यंत्रावर आपले नाव पहिल्या क्रमांकावर असावे यासाठी खूप मेहनत घेतली. मात्र, त्यामध्ये त्यांना यश आले नाही. परिणामी, वर्णमालेनुसार अमृता वाघमारे यांचे नाव मतदान यंत्राच्या पहिल्या क्रमांकावर आले आहे. यामुळे भोगावले यांचे नाव दुसऱ्या क्रमांकावर गेले आहे. तर स्नेहल माणिक जगताप यांचे नाव तिसऱ्या क्रमांकावर गेले आहे.

प्रचार करताना नेहमीच मतदान यंत्राच्या पहिल्या बटणावर नाव येण्यासाठी उमेदवारांचा मोठा कल असतो. महाड मतदारसंघात वर्णमालेनुसार पहिल्या क्रमांकावर अमृता वाघमारे यांचे नाव आल्याने भरत गोगावले यांनी चांगला धक्का घेतला आहे. याबाबत सर्वत्र चर्चांना उधाण आले आहे.

### बालदींविरोधात आगरी समाज आक्रमक

महिलांबद्दल अनुद्गार काढले होते. २९ ऑक्टोबर रोजी निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या निमित्ताने आयोजित केलेल्या जाहीर सभेत त्यांनी आगरी समाजाबद्दल पुन्हा एकदा हेटाळणीयुक्त आणि अवमान करणारे शब्दप्रयोग केले आहेत. लोकनेते दि.बा. पाटील हे आगरी समाजाचे तसेच भूमीपुत्र आणि कष्टकऱ्यांचे श्रद्धास्थान आहेत. त्यांचे नाव नवी मुंबई विमानतळास लागावे यासाठीचा ठराव राज्य सरकारने केंद्राकडे पाठविला आहे. सदर सभेत महेश बालदी यांनी हेतुपुरस्सर विमानतळाच्या उल्लेख अदानी विमानतळ असा करून लोकनेते दि.बा. साहेबांचाही अवमान करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे समाजात असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे. त्याची दखल घेऊन आगरी समाजाची शिखर संस्था असलेल्या 'अखिल आगरी समाज परिषदेने' १ नोव्हेंबर रोजी सदर महेश बालदी यांना निषेधाचे पत्र लिहून त्यांनी समाजाची जाहीर माफी मागावी, अशी मागणी केलेली आहे. परंतु, महेश बालदी यांनी आजपर्यंत समाजाची माफी मागितल्याचे दिसून येत नाही. वरील पार्श्वभूमीवर महेश बालदी यांचा जाहीर निषेध करण्यासाठी आणि त्यांनी आगरी समाजाची जाहीर माफी मागावी या मागणीसाठी आगरी समाजातर्फे १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता उरण पोलीस ठाणे येथे मोर्चाचे आयोजन केले आहे. कोटनाका येथील उरण शहर प्रवेशद्वारावर सर्वांनी अगोदर एकत्र यायचे आहे. नंतर पोलीस ठाण्यावर मोर्चा काढायचे आहे, असे यावेळी सुधाकर पाटील यांनी कळविले आहे. तरी सर्वांनी या मोर्चात आपल्या सहकाऱ्यांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा आगरी नेते सुधाकर पाटील यांनी केले आहे.

### भीमशक्ती चिऊताईंच्या पाठीशी


राजू रणवीर, जिल्हा संघटक संजय भोसले, रोहा तालुक्यातील रवींद्र दाभणे, सुशील मोहिते, श्रीयश मोहिते आदी पदाधिकारी उपस्थित होते. चित्रलेखा पाटील यांना वेगवेगळ्या सामाजिक संस्था, संघटनांच्यावतीने पाठिंबा देण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या विजयाचा मार्ग सुकर होऊ लागल्याचे चित्र दिसून येत आहे.

### गुन्हेगारीविरोधात मिशन ऑलआउट

संशयितांचीदेखील पाहणी पोलिसांनी या मिशनदरम्यान केली. त्यामध्ये दारु विक्री करणारे, न्यायालयात हजर न राहणारे, दारु पिऊन वाहन चालविणारे अशा अनेकांवर रायगड पोलिसांनी कारवाई केली. त्यामध्ये अलिबाग उपविभागीय अधिकारी विनित चौधरी यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या मांडवा पोलिसांनी सात हॉटेल, लॉज व रिसॉर्ट, दारु पिऊन वाहन चालविणारे तिघे, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणारे चौघे, तसेच वॉरंट आणि समन्स बजावणी असणाऱ्या चार जणांविरोधात कारवाई केली. पोलिसांनी ७८ संशयित वाहनांची तपासणी केली. त्यामध्ये ९८ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरोधात कारवाई केल्याची माहिती समोर येत आहे. ऐन निवडणुकीत पोलिसांच्या मिशन ऑल आऊटमध्ये अवैध धंदे चालविणारे, बेकायदेशीररित्या दारु विक्री व निर्मिती करणाऱ्यांना दणका मिळाला आहे.

## ई-रिक्षाला मागणी जास्त, पुरवठा कमी

**। माथेरान । वार्ताहर ।**



माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांचा ओघ वाढला असून प्रवासी वाहतुकीसाठी हातरिक्षा, घोडे, मिनी ट्रेन आणि आता ई-रिक्षा सुद्धा उपलब्ध आहेत. दस्तुरीपासून माथेरानमध्ये येण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध असले तरी पर्यटकांकडून ई-रिक्षांना पसंती दिली जात आहे. पावसाळ्याच्या चार महिन्यांत लाखो पर्यटक माथेरानमध्ये दाखल झाले होते. जलद आणि कमी पैशात प्रवास होत असल्याने ई-रिक्षांकडे स्थानिकांसह पर्यटकांचाही ओघ वाढला आहे.

सनियंत्रण समितीच्या आदेशानुसार, माथेरानमध्ये सद्यःस्थितीत फक्त २० ई-रिक्षा धावत आहे. त्यातील १५ रिक्षा या शालेय विद्यार्थ्यांसाठी असल्याने फक्त पाच रिक्षा प्रवासी वाहतुकीसाठी उपलब्ध आहेत. त्यामुळे पर्यटकांना तासन्तास रांगेत ताटकळत उभे राहावे लागत आहे. त्यामुळे ई-रिक्षांच्या संख्येत वाढ करण्याची मागणी नागरिकांसह पर्यटकांकडून होत आहे.

२६ डिसेंबर रोजी ई-रिक्षाचा दुसरा प्रायोगिक तत्त्वावर हा प्रोजेक्ट सुरू झाला. पहिल्या प्रायोगिक तत्त्वावर फक्त सात रिक्षा धावत होत्या. पण त्यासुद्धा कमी पडत होत्या. सर्वोच्च न्यायालयात दाद मागताना श्रमिक हातरिक्षा संघटनेला काही अंशी यश आले. त्यानंतर डिसेंबरपासून २० ई-रिक्षा प्रायोगिक तत्त्वावर धावू लागल्या. अवघ्या ३५ रुपये माथेरान गाठता येत असल्याने ई-रिक्षाला प्रवाशांची पसंती मिळत आहे. दस्तुरीपासून माथेरान रेल्वे स्थानक या दोन किलोमीटर अंतरासाठी घोडा आणि हातरिक्षाचे दर जास्त आहे.

मिनी ट्रेनचा पर्याय असला तरी फेऱ्या अपुऱ्या आहेत. शिवाय तासभराच्या प्रवासाचे तिकीट मिळवण्यासाठी रांगेत तासन्तास उभे राहावे लागत असल्याने अनेकजण ई-रिक्षाचा पर्याय स्वीकारतात. शालेय विद्यार्थ्यांची पायपीट कमी व्हावी, यासाठी प्रामुख्याने ई-रिक्षा सुरू करण्यात आल्या आहेत. त्यांच्यासाठी सनियंत्रण समितीने १५ रिक्षाचे नियोजन केले आहे. त्यामुळे केवळ पाच ई-रिक्षा नागरिक, पर्यटक, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग तसेच आजारी रुग्णासाठी राखीव आहेत. स्थानिक तसेच पर्यटकांच्या तुलनेत ही संख्या खूपच अपुरी आहे. हातरिक्षा चालक-मालकांची संख्या ९४ असताना फक्त २० ई-रिक्षाचालकांना परवानगी देण्यात आल्याने इतरांवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त होत आहे. ई-रिक्षांच्या अपुऱ्या संख्येमुळे अनेकदा रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाही तर काही वेळा ज्येष्ठांवर पायपीट करण्याची वेळ येत असल्याने नाराजी व्यक्त केली.

> माथेरानच्या ई-रिक्षा सनियंत्रण समितीच्या देखरेखीखाली सुरू आहेत. हा प्रायोगिक तत्त्वांचा दुसरा टर्म आहे. यामध्ये प्रवासी संख्या जास्त आणि ई-रिक्षा कमी पडत आहेत. सर्व ऋतूमध्ये ई-रिक्षा जोमाने चालली आहे, कुठेही अडचण आली नाही. त्यामुळे बाकी ७४ हातरिक्षा चालकांना ई-रिक्षा द्याव्यात, अशी आमची मागणी आहे. त्यामुळे हातरिक्षाच्या अमानवी प्रथेला तिलांजली मिळून सर्व हातरीक्षा चालक सन्मानाचे जीवन जगता येईल. - सुनील शिंदे, सचिव, श्रमिक रिक्षा चालक संघटना.

## पारंपरिक माडी व्यवसाय नामशेष होण्याच्या मार्गावर

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

तालुक्यातील भंडारी समाजाचा पारंपरिक, तसेच उदरनिर्वाहाचे साधन असणारा आरोग्यदायी माडी पेयाचा व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर आहे. निसर्ग चक्रीवादळात ६० टक्के माड भुईसपाट झाल्यामुळे या व्यवसायाला मंदी आली आहे. त्यातच भंडारी समाजातील तरुण पिढीने माडी उतरवणे या पारंपरिक व्यवसायाकडे पाठ फिरवल्याने श्रीवर्धनची प्रसिद्ध अशी आरोग्यदायी, चविष्ट व गोड माडी आता इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आहे.

भंडारी समाजाचा पारंपरिक व्यवसाय हा आरोग्यदायी माडी पेय तयार करणे हा आहे. नारळाच्या माडावरील पोय हा औत हत्याराच्या सहाय्याने कापून झाल्यावर त्या ठिकाणावर लाल मातीचे किंवा प्लॅस्टिक मडके लावले जाते. त्यानंतर पोयातून बाहेर येणारा द्रव जमा करून त्यावर प्रक्रिया केली जाते. प्रक्रिया संपूर्ण झाल्यावर तयार माडी ड्रममधून शहरी भागात निर्यात केली जाते. अथवा बाटल्यांमधून स्टॉलवर विक्रीकरिता ठेवली जाते. साधारण एका माडापासून दर महिन्याला ७० लिटर माडीचे उत्पादन होते. श्रीवर्धन येथील आरोग्यदायी माडी पेयाला चांगली मागणी आहे.

सद्यपरिस्थितीत हातात औत, सायकलला लावलेली कुंडी व घडी, कंबरेला बांधलेला आकडा व कापडी पिशवीत जास्वंदीची पाने ठेवून माडावरचा पोय कापणारा व माडी पेय उतरवणारा भंडारी समाजातील तरुण तालुक्यात कमी झाला आहे. या समाजातील तरुणांनी पूर्व परंपरागत व्यवसायाकडे पाठ फिरवून इतर उद्योग, व्यवसायाकडे आपला मोर्चा वळविला आहे. त्यामुळे भविष्यात श्रीवर्धन येथील आरोग्यदायी माडी पेय इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आहे.




# प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची शामा !

**गुरुदत्त यांच्या 'आरपार' मधून नायिका म्हणून उदयाला आलेली हसरी, ग्लॅमरस अभिनेत्री 'शामा' ऑक्टोबर १४ नोव्हेंबर २०१७ मध्ये आपणास सोडून अल्लाला प्यारी झाली होती. सुमारे १५० चित्रपटांतून ही अभिनेत्री तिच्या अनेक चित्रपटांतील सुंदर अदा मागे ठेवून गेली आहे.**





शरद कोरडे

चित्रपटसृष्टीत 'शामा' नावाने सुप्रसिद्ध असलेल्या मूळ खुर्शिद अख्तर नाव असलेली ही अभिनेत्री ९ जून १९३५ साली पंजाबमधील लाहोरमध्ये जन्माला आली. लाहोरमधून ही १९४० साली मुंबईला आली. मुंबईत तिला वडिलांनी सुप्रसिद्ध गायिका व अभिनेत्री नूरजहाँ हिचे पती शौकत रिजवी यांची भेट घेतली. माझ्या मुलीला तुमच्या चित्रपटात घ्या अशी विनंती त्यांनी केली. सुंदर चेहऱ्याच्या व हसऱ्या बाहुलीला पाहून शौकत रिजवी यांनी तिला आपल्या 'झीनत' (१९४५) व 'मास्टरजी' या चित्रपटात बालकलाकारांची भूमिका दिली. नऊ वर्षाच्या खुर्शिदने प्रेक्षकांची मने जिंकली. प्रकाश पिक्चर्सचे निर्माते दिग्दर्शक विजय भट्ट यांनी खुर्शिदला आपल्या कंपनीत घेतले व तिचे नाव बदलून तिला 'शामा' हे नाव दिले. याच शामाने पुढे अनेक चित्रपटांतून उत्तमोत्तम भूमिका करून चित्रपटसृष्टीवर राज्य केले.

शामा हिने अभिनयाचे कोणतेही प्रशिक्षण घेतले नव्हते व तिला थिएटरमध्ये कुणीही गुरू नव्हता. तिच्या भूमिकेचा ती बारकाईने अभ्यास करी व त्यासाठी दिग्दर्शकाकडून चित्रपटाची स्क्रिप्ट मागून घेई. तिचे पूर्ण वाचन करून ती आपल्या भूमिकेची तयारी करत असे व पूर्ण तयार होऊन ती आत्मविश्वासाने चित्रीकरणासाठी जात असे. त्यामुळे ती दिग्दर्शक व सहकलाकार यांची आवडती अभिनेत्री झाली होती. शामाने शौकत रिझवी यांच्या 'झीनत' नंतर 'शायर' (१९४९), 'शबनम' (१९४९), 'रूपलेखा' (१९४९) 'नाच' (१९४९) व १९५० सालच्या 'निली', 'निशाना', 'जान पहचान' व 'झेलती नैय्या' आदी चित्रपटांतून सहाय्यक भूमिका केल्या. १९५१ साली निर्माता दिग्दर्शक राम दरयानी यांच्या 'तराना' मुळे दिलीपकुमार व मधुबाला यांच्यासमोर सहनायिका म्हणून शिलाची भूमिका तिने बहारदारपणे केली. त्यामुळे पुढे अनेक चित्रपटांतून तिला नायिकेच्या भूमिका मिळू लागल्या. पुढे शामाने 'श्रीमतीजी' १९५२, 'ठोकर', 'सुहाग-सिंदूर', 'दिले नादान' १९५३ व १९५४ मधील 'शर्त' 'सावधान', 'पेन्शनर', 'मजबूरी', 'धूपछाँव' व'दरवाजा' या चित्रपटांतून भूमिका केल्या. पुढील पाच वर्षांत निर्माते दिग्दर्शक व अभिनेता गुरूदत्त यांच्या'आरपार' हिट झाला.'ये लो मै हारी पिया हुई तेरी जीत रे','हूँ अभी मै जवाँ', व'जा जा जा बेवफा तू ना किसीका यार रे' ही शामावर चित्रीत झालेली गाणी व महंमद रफी, शमशाद बेगम यांनी गायलेली गाणी खूप गाजली.'आरपार' ने ओ.पी. नय्यर यांच्या संगीतकार पदावर शिक्कामोर्तब केले.त्यानंतर शामाने 'मुसाफिरखाना', 'मख्खीचूरा', 'छूँ मंतर', 'भाई भाई', 'सुवर्ण सुंदरी', या चित्रपटांतून महत्त्वपूर्ण भूमिका केल्या. १९५७ मध्ये बालजरठ विवाह पद्धतीवर बेतलेला एल.व्ही. प्रसाद यांच्या 'शारदा' या चित्रपटातील 'चंचला' या धीरोदात्त व फटकल सहनायिकेच्या भूमिकेसाठी फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. या चित्रपटात राजकपूर व मीनाकुमारी यांनी भूमिका केल्या होत्या. त्यानंतर त्याचवर्षी रामाने 'मिर्झा शाहीबान', 'मायबाप', 'जॉनी वॉकर', 'हिल स्टेशन', 'बंदी' व ए.व्ही.एम. चा गाजलेला कृष्णन पंतू निर्देशित 'भाभी' हे चित्रपट केले. भाभीमध्ये शामासोबत बलराज साहनी, पंढरीबाई, नंदा, जवाहर कौल, राजा गोसावी व रहेमान ही आघाडीची कलावंत मंडळी होती. ग्रामीण पार्श्वभूमीवरील हा चित्रपट कलाकारांचा उत्कृष्ट अभिनयामुळे, दिग्दर्शकाच्या हाताळणीमुळे व राजेंद्र कृष्ण यांच्या अर्थपूर्ण गाण्यांमुळे लोकप्रिय झाला. या चित्रपटातील महंमद रफी यांनी गाईलेले व चित्रगुप्त यांनी संगीत दिलेले 'चल उड जा रे पंछी के अब ये देश हुआ बेगाना' हे गाणे खूप लोकप्रिय झाले. १९५८ मध्ये शामाने 'तकदीर', 'पंचायत', 'लालारूख', 'चंदन', 'बस कंडक्टर' हे चित्रपट केले. त्यानंतर १९६० मध्ये विश्वभारती फिल्म्सचा पी.एल. संतोषी निर्देशित 'बरसात की रात' या भारतभूषण व मधुबाला या जोडीबरोबर नायकावर प्रेम करणाऱ्या कव्वाली गायिकेचे काम शामाने केले. या भूमिकेत तीन चार चाँद लावले. या चित्रपटाची नायिका मधुबाला असली तरी शामाची मध्यवर्ती भूमिका होती. तीने ती तिच्या खास शैलीत व आदाकारीत केली. १९६३ मध्ये आलेल्या 'बहुरानी' मध्ये तिने चंदा नामक सहनायिकेची भूमिका केली. या चित्रपटात गुरूदत्त, मालासिन्हा, फिरोजखान व ललिता पवार यांनी भूमिका केल्या होत्या. त्यानंतर तीने नामवंत नायकांसोबत सहनायिकेचे काम केले. त्यांत 'जी चाहता है' १९६४ मध्ये जॉय मुखर्जी सोबत, 'दिल दिया दर्द लिया' १९६६ मध्ये दिलीपकुमार सोबत, 'जानवर' १९६६ मध्ये शम्मीकपूर सोबत, 'मिलन' १९६७ मध्ये सुनील दत्त सोबत, 'मस्ताना' १९७० मध्ये मेहमूद रेहमान सोबत, 'सावन भादो' १९७० मध्ये नवीन निखील सह तिने सहनायिकेच्या भूमिका केल्या.

त्याशिवाय तिने 'सूरज और चंदा' मध्ये संजीवकुमार व पद्मिनीसह 'नया दिन नयी रात' मध्ये संजीवकुमार, जया भादुरीसह 'अजनबी' मध्ये राजेश खन्ना, झीनत अमानसह व 'खेल खेल मे' मध्ये ऋषी कपूर, रितू सिंग सह तिने महत्त्वपूर्ण भूमिका केल्या. राजश्री प्रॉडक्शनच्या १९८० सालच्या 'पायल की झंकार' हा तिचा बहुदा शेवटचा सिनेमा असावा. शामाने अशोककुमार, महिपाल, गुरूदत्त, दिलीपकुमार, जॉनी वॉकर, आगा, धर्मेंद्र, मनोजकुमार, भारतभूषण, राजेंद्रकुमार आदी नामवंत अभिनेत्यांसह भूमिका केल्या.हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीचे कॅमेरामन फली मिस्त्री जे पारसी समाजातील होते, त्यांच्यासमवेत शामा यांनी १९५३ मध्ये विवाह केला. फली मिस्त्री यांनी गाईड, हरे राम हरे कृष्ण, एक मुसाफिर एक हसिना आदी चित्रपटाचे चित्रीकरण केले होते. त्यांनी 'ताज' १९५६ व 'चंदन' १९५८ या चित्रपटांची निर्मिती केली होती. फली मिस्त्री यांचे १९८९ साली निधन झाले. आपल्या तीन मुलांसह शामाने सन्मानाने जीवन व्यथित केले होते. शामा नेहमी म्हणत असत 'मी खूप भाग्यवान अभिनेत्री आहे. मला फली मिस्त्रीसारखा जीवनसाथी मिळाला. तीन सुजाण मुले लाभली व अनेक चांगली माणसे मिळाली, त्यामुळे मी आनंदाने व समाधानाने जगले.'१४ नोव्हेंबर २०१७ ला शामा आपल्या ८२ व्या वर्षी अल्पशा आजाराने मृत्यू पावली. तिचे निखळ हास्य व आनंदाने रसरसलेला चेहरा आपण विसरू शकणार नाही. ●●

# द किंग ऑफ म्युझिक गुलशनकुमार



श्रीराम शेटये

दिल्लीतील एका छोट्याशा दुकानात फळांचा रस विकणारा तो मुलगा. आपण आयुष्यभर फळांचा रसच विकत राहणार आहोत का? अशा गहिऱ्या विचारात गढलाय! छोटेसे वय परंतू विचारांची अनेक वादळे त्याच्या मनात घोंगावतायत. दुर कुठे तरी महादेवांच्या भजनाचे सुर कानावर पडत आहेत. तो छोटा मुलगा आता भक्तीरसात डुंबून गेला आहे. त्याला कशाचेही भान नाही. संगीताची आपसुकच ओढ होती. त्याचे मन गगनभरारी घेऊ लागले त्याने मनाशी ठरविलें आपण आयुष्यभर एक फळांचा रस विक्रेता एवढंच ध्येय बाळगून रहाणार नाही. नक्कीच नवीन ध्येय निच्शित करायला हवे. मग आपल्या बालमनात त्याने संगीताच्या दुनियेतील एक बीज पेरले. कोणतेही ध्येय हे मनात प्रथम आकार घेते. प्रत्येक मोठ्या प्रकल्पाचे ध्येय हे मनात पहिले अधोरेखित होते. मग आपण त्याला आकार देतो. त्याच्यावर काम करतो मेहनत घेतो तेव्हा ते प्रत्यक्षात येते. 'मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण' असे संत तुकाराम महाराज म्हणायचे त्याचे कारण तेच आहे. छोट्या गुलशनने स्वप्न पाहिले होते संगीताच्या दुनियेचे आणि ते प्रत्यक्षात उतरविण्याचे.

दिल्लीतील दरियागंज परिसरातील एका छोट्याश्या गल्लीत गुलशन कुमार यांच्या वडीलांचे दुकान होते. गुलशन कुमार यांचे वडील चंद्रभान पंजाबी परिवारातील होते. चंद्रभान यांचे छोटेसे दुकान होते. त्यांचा फळांचा रस (ज्यूस) विकण्याचा धंदा होता. याच धंद्यावर बसलेला छोटा गुलशन चित्रपट निर्मितीची स्वप्ने बघायचा. या क्षेत्रात आलेला प्रत्येक माणूस हिरो बनण्यासाठीच आलेला असतो परंतू या क्षेत्रात यश त्याला कसे मिळते त्यावरच पुढची वाटचाल होते. चित्रपट क्षेत्रातील मायावी दुनिया सर्वांनाच खुणावत असते. परंतू यात यशस्वी फार कमी लोक होतात. काही सटफकीर होतात तर काही होते नव्हते ते सर्व गमावून बसतात.

खर तर फळांचा रस विकण्याच्या धंद्यात गुलशनला फारसा रस नव्हता. संगीत ही त्याची आवड होती. असं म्हणतात एखाद्या ध्येयाला तुम्ही मनापासुन आकर्षित केलात तर ते ध्येय नक्की साध्य होते. गुलशन कुमार यांच्या बाबतीत असेच झाले. गुलशन कुमार यांनी वडीलांना आग्रह करून आणखीन एक नवीन दूकान घेतले. या दुकानात स्वस्त कॅसेट विकण्याचा व गाणी रेकॉर्डिंग करून देण्याचा व्यवसाय सुरू केला. या व्यवसायाने हळू हळू जोर धरला. यातूनच गुलशन कुमार यांची त्यांच्या धेयाकडे वाटचाल सुरू झाली. अनेक लोकप्रिय चित्रपट गीते, लोकगीते, भक्तीगीते गुलशन कुमार रेकार्ड करून देऊ लागले. स्वस्त दरात उपलब्ध होत असलेल्या सेवेमुळे लोकांची दुकानात गर्दी होऊ लागली.

गुलशन कुमार यांनी पुढे जाऊन सुपर कॅसेट इंडस्ट्रीज लिमिटेड नावाची स्वतःची कंपनी सुरु केली. भारतातील ती सर्वात मोठी कॅसेट इंडस्ट्रीज झाली. त्यांच्या याच कंपनीच्या माध्यमातून त्यांनी टी सीरीज कंपनीची स्थापना केली. गुलशन कुमार यांनी त्यासाठी नोएडा येथे स्वतःची कॅसेट प्रोडक्शन कंपनी खोलली.

गुलशन कुमार शिवभक्त होतेच त्यामुळे त्यांना भक्तीगीतांची ओढ होतीच. गणेशाची भक्तीगीते, गणपती स्तोत्र, हनुमान चालीसा, देवी स्तोत्र, शिव, वैष्णवा देवी अशा विविध भक्तिगीते व स्तोत्र त्यांनी नामांकित गायकांच्या आवाजात संगीतबद्ध केली व प्रसारीत केली. लोकप्रिय गायिका अनुराधा पौडवाल गुलशन कुमार यांच्या काफील्यात सामील झाली. अनुराधा पौडवाल यांच्या सुरेल मधुर हृदयाचा ठाव घेणाऱ्या भक्तीगीतांनी चार चांद लावले. मग जगभरातून सुरु झाली ती गुलशन कुमार यांच्या कॅसेटची भरघोस विक्रमी विक्री.

त्यांच्या या भक्तिगीतांच्या कॅसेटला प्रचंड मागणी येऊ लागली. त्यांची भक्तीगीते फार लोकप्रिय झाली. जगभरातील चार द्विप आणि सर्वच देशात हा हा म्हणता त्यांच्या कॅसेटचा व्यवसाय जगभर पसरला. 'गुलशनकुमार' 'कॅसेट किंग' म्हणून ओळखले जाऊ लागले. एका फळांचा रस विक्रेत्याचा मुलगा आंतराराष्ट्रीय बाजारात 'कॅसेट किंग' झाला. धंद्याचा व्याप दिल्लीतून सांभाळणे अवघड होऊ लागले. वाढलेल्या धंद्यामुळे गुलशन कुमार यांनी आपला व्यवसाय मुंबईत प्रस्थापित केला. मुंबईत आल्यावर त्यांचे नशिब उघडले. मुंबईतल्या चित्रपट निर्मितीच्या व्यवसायात त्यांनी उडी घेतली. त्यांनी सुमारे पंधरा चित्रपटांची निर्मिती केली. त्यापैकि 'बेवफा सनम' हा एक चित्रपटही त्यांनी दिग्दर्शित केला. 'लाल दुपट्टा मलमल का' हा त्यांचा पहिला चित्रपट. 'क्या करते थे साजना तुम हमसे दुर रहे के?' व 'लाल दुपट्टा मलमलका' ही गाणी चांगलीच गाजली होती. आपला धाकटा भाऊ कृष्णकुमार याला मुख्य अभिनेत्याची भुमिका देऊन त्यांनी हा चित्रपट बनविला. परंतु फारसा अनुभव नसलेला कृष्णकुमार याच्या सुमार अभिनयामुळे हा चित्रपट फारसा चालला नाही. या चित्रपटातील गाणी मात्र सुपरहिट झाली होती. चित्रपट फारसा चालला नसला तरी गाण्यांमुळे गुलशन कुमार यांची लोकप्रियता वाढली. परंतू त्यांना चित्रपट विश्वात खरी ओळख मिळाली ती सन १९९० मध्ये 'आशिकी' हा महेश भट्ट यांच दिग्दर्शित केलेला गुलशन कुमार यांची निर्मिती असलेला चित्रपट खुप गाजला. या चित्रपटाची स्टोरी आणि गाणी अप्रतिम होती. अनुराधा पौडवाल आणि कुमार सानु यांच्या आवाजातील गाणी खुपच लोकप्रिय झाली. ही गाणी राहुल राय व अनू अग्रवाल या नव्या दमाच्या कलाकारांवर चित्रित झालेली गाणी प्रचंड हिट झाली. त्यातील 'मै दुनिया भुला दुंगा तेरीही चाहते मे', 'नजर के सामने जिगर के पास', 'अब तेरे बिन जी लेंगे हम', 'धिरे धिरे मेरी जिंदगी मे आना' या आशिकी चित्रपटाच्या गाण्यांनी इतिहास घडविला खुपच लोकप्रिय झाली. नदिम श्रवण यांचे लोकप्रिय संगीत कुमार सानू आणि अनुराधा पौडवाल यांच्या युगल गीतांची अप्रतिम जुळणी मनोहर होती.

गुलशन कुमार आपल्या भक्तिगीतासांठी लोकप्रियतेच्या शिखरावर होते. परंतू त्यांच्या या व्यवसायिक यशावर मुंबईच्या अंडरवर्ल्डची दुर्दैवाने वक्रदृष्टी पडली. अबू सालेम नावाच्या गँगस्टरने गुलशन कुमार यांच्याकडे महिना पाच लाख रुपये खंडणी मागितली. गुलशन कुमार यांनी साफ नकार दिला. तुला खंडणी देण्याऐवजी मी त्या पाच लाखात मा वैष्णव देवीचा भंडारा करीन असे गुलशन कुमार म्हणाले. अंडरवर्ल्डची नजर गुलशन कुमार यांच्या जगभरातील करोडोंच्या व्यवसायावर होती. येनकेन प्रकारेन त्यांना गुलशन कुमार यांच्याकडून खंडणी वसुल करायची होती.

क्रोधित झालेल्या अबू सालेम डाव धरूनच बसला होता. एक दिवस गुलशन कुमार यांचा घात केला. मुंबईतील साऊथ अंधेरी परिसरातील जितेश्वर महादेव मंदिरात गुलशन कुमार नित्य येत असत. अनेक दिवस त्यांच्यावर पाळत ठेवण्यात आली.

शेवटी एक दिवस शत्रूने डाव साधलाच गुलशन कुमार मंदिरात वीना बॉडीगार्ड पुजा करण्यासाठी जात होते. अबू सालेम यांने आपला शार्पशुटर राजा याच्या मार्फत त्यांची हत्या करविली. हल्लेखोरानी सोळा गोळ्या घालून गुलशन कुमार यांचे शरीर छलनी केले. बॉलीवूड मध्ये हाहाकार पसरला. मीडियावर एकच बातमी येऊ लागली. एका शिवभक्ताचा अंत झाला परंतू आपल्या भक्तिगीतांनी गुलशन कुमार जनमाणसाच्या हृदयात अजरामर होऊन राहिले. ●●

# 'मु.पो.बोंबिलवाडी' १ जानेवारी २०२५ रोजी होणार प्रदर्शित




**हरीश्चंद्राची फॅक्टरी, एलिझाबेथ एकादशी, वाळवी या तीन मराठी चित्रपटांना मिळालेल्या राष्ट्रीय पुरस्कारांच्या हॅटट्रिकनंतर लेखक-दिग्दर्शक परेश मोकाशी आणि निर्माती मधुगंधा कुलकर्णी यांनी घोषणा केलेल्या 'मु.पो. बोंबिलवाडी'बद्दलची उत्कंठा शिगेला पोहोचली असताना या चित्रपटात हिटलर व चर्चिलच्या भूमिका कोण बजावणार यांबद्दल रसिकांमध्ये कुतूहल होते. हिटलरच्या भूमिकेत 'क्युट' प्रशांत दामले झळकणार हे स्पष्ट झाल्यानंतर आत्ता चर्चिलच्या भूमिकेत आनंद इंगळे दिसणार असल्याचे जाहीर झाले आहे. निर्मात्यांनी आज 'मु. पो.बोंबिलवाडी' चे पोस्टर प्रदर्शित केले.१ जानेवारी २०२५ रोजी प्रदर्शित होऊ घातलेल्या या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे चित्रपट मल्टी-स्टार आहे. प्रशांत दामले, आनंद इंगळे, वैभव मांगले, गीतांजली कुलकर्णी, सुनील अभ्यंकर, मनमित पेम, रितिका श्रोत्री, प्रणव रावराणे, अद्वैत दादरकर, गणेश मयेकर, दीप्ती लेले, राजेश मापुस्कर हे चित्रपटसृष्टीतील आघाडीचे कलाकार चित्रपटात**

प्रतिनिधी

परेश मोकाशी, मधुगंधा कुलकर्णी यांच्या गतवर्षी चित्रपटगृहांमध्ये धमाल उडवून देणाऱ्या 'वाळवी'ला अलिकडे राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. त्यांच्या 'नाच गं घुमा'ने यंदा प्रचंड प्रतिसाद मिळविला. हरीश्चंद्राची फॅक्टरी, एलिझाबेथ एकादशी, ची. व ची. सौ. का., आत्मपॅम्प्लेट यांसारख्या त्याआधीच्या दर्जेदार व गाजलेल्या चित्रपटांची निर्मिती त्यांनी केली होती. राष्ट्रीय पुरस्काराचा आनंद द्विगुणीत करत परेश आणि मधुगंधा यांनी त्यांच्या 'मु.पो.बोंबिलवाडी- १९४२ एका बॉम्बची बोंब'ची घोषणा दोन महिन्यांपूर्वी केली. चित्रपटाच्या घोषणेनंतर प्रदर्शित केलेल्या मोशन पोस्टरवरून ही स्वातंत्र्यपूर्व काळातील एक ब्रिटीशकालीन कथा आहे आणि एका बॉम्बस्फोटाभोवती ती फिरते, अंदाज रसिकांना आला होता. आज प्रदर्शित करण्यात आलेल्या पोस्टरच्या माध्यमातून नवनवीन पात्रे रसिकांसमोर येतात. ती साकारात असलेले कलाकार या पोस्टरमध्ये दिसतात आणि एवढी मोठी स्टारकास्ट असल्याने चित्रपट अत्यंत दर्जेदार असेल, याची खुणगाठ प्रेक्षक आपोआप बांधतो. या चित्रपटाची निर्मिती मधुगंधा कुलकर्णी, विवेक फिल्म्स आणि मयसभा करमणूक मंडळी यांची असून लेखन-दिग्दर्शन परेश मोकाशी यांचे आहे. काही वर्षांपूर्वी आलेल्या आणि प्रचंड गाजलेल्या याच नावाच्या नाटकाचे हे चित्रपटीय स्वरूप आहे. रसिकांच्या मागणीवरून ही चित्रपट निर्मिती संहितेत काही बदल करून केली गेली आहे. या चित्रपटाबद्दल बोलताना परेश मोकाशी म्हणाले, ''मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी' हे नाटक लोकांना इतके आवडले की तो माझ्यासाठी एक सुखद धक्का होता! 'बोंबिलवाडी'सारख्या छोट्या गावात इंटरनॅशनल घटना घडतात आणि त्यावर दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा निकाल लागतो ही फार्सिकल गोष्ट आजही तितकाच व्यायाम देईल फुफ्फुसांना!''हा चित्रपट प्रेक्षकांनी का पहावा, असा प्रश्न विचारला असता मोकाशी यांनी मिश्कील उत्तर दिले आहे. ''आजकाल व्यायाम नीट होत नाही, त्यामुळे फुफ्फुसांनाही व्यायाम होत नाही. 'मुक्काम पोस्ट बोंबीलवाडी' एवढा हसवतो की त्यामुळे फुफ्फुसांना खूप व्यायाम होतो. हे चित्रपट पाहण्याचे आरोग्यदायी कारण आहे.''

चित्रपटाच्या निर्मात्या मधुगंधा कुलकर्णी म्हणाल्या, ''आनंदाची बाब म्हणजे प्रशांत दामले यांनी हिटलरचे काम करायला हो म्हटल्यामुळे चित्रपटाचे मूल्य वाढले आहे. चित्रपट आपोआपच मोठा झाला. त्यांनी अप्रतिम काम केले आहे. यात प्रशांत दामले यांच्याबरोबरच इतर कसलेले कलाकार चित्रपटात आहेत, त्यामुळे एक चांगली भट्टी जमून आली आहे. त्यांचे अभिनय उत्तम झाले आहेत. ही एक धमाल लाफ्टर राईड झाली आहे.'' निर्माती कंपनी विवेक फिल्म्सचे भरत शितोळे या चित्रपटाबद्दल बोलताना म्हणाले, ''आपल्या मातीतील ही कथा आहे आणि आपल्या मातीमध्ये येणारी आंतरराष्ट्रीय पात्रे व त्यांची होणारी भीड याची गम्मत आहे या चित्रपटामध्ये. हे नाटक आम्ही बघितले आहे. नाटक आणि चित्रपटात ह्युमर आणि फार्स समान आहे. चित्रपट इतका सुंदर आणि विनोदाच्या इतक्या वेगळ्या पातळीला जातो कि हसून हसून पुरेवाट होते.'' ●●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, **संपादकीय विभाग**–email : krushivalnews@gmail.com / **जाहिरात विभाग**– email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)